!! ज्ञानदीप लावू जगी !!

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्था, धुळेचे

# स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी

ता. साक्री, जि. धुळे

नॅक प्रमाणित B ग्रेड (CGPA 2.41)



# राष्ट्रीय सेवा योजना

स्थापना-१ जुलै १९९८

## नियमित कार्यक्रम अहवाल

### शैक्षणिक वर्ष : २०२२ - २३


डॉ. रमेश चुडामण अहिरे

रासेयो, कार्यक्रम अधिकारी

मो. नं. ९७६३०११९९१

rc_ahire@rediffmail.com

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३



**प्र. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील**



डॉ. रमेश अहिरे
कार्यक्रम अधिकारी



डॉ. वनिता पवार
महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी



डॉ. बाबासाहेब मोताळे
सहाय्यक कार्यक्रम अधिकारी

# NOT ME BUT YOU

# शुभ संदेश



माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेऊन समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फुल न फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचीन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टौप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे व लाल रंग हे तरुणांचे सळसळते रक्त हे राष्ट्र उभारणीचे प्रतिक असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजना राबवित असलेल्या उपक्रमातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे.

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी, येथील राष्ट्रीय सेवा योजना एककात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून १७० स्वयंसेवकाची तुकडी असून; यात प्रामुख्याने ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सहभागी असतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. सी. अहिरे, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, प्रा. डॉ. व्ही. टी. पवार आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. टी. मोताळे यांच्या मार्गदर्शनाखाली या माध्यमातून विविध समाजउपयोगी उपक्रम नियमित कार्यक्रमांतर्गत राबवित असते. दर वर्षी दत्तक गावात सात दिवसीय निवासी विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्व विकास करतांना त्यांना ग्रामीण जीवनातील समस्यांची ओळख करून देत त्या सोडविण्यासाठी निस्वार्थ काम करण्यास युवकांना प्रेरित करते.

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या नियमित कार्यक्रम अहवालास माझ्या अनंत शुभेच्छा !!!!!**

डॉ. शिवाजी पाटील
प्र. प्राचार्य

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विवरण | दिनांक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | | |
| १ | धनदाई देवी मंदिर – चैत्र यात्रा उत्सव निमित्त - यात्रेतील गर्दी नियंत्रण, व्यवस्थापन आणि स्वच्छता | ८/४/२२ ते ९/४/२२ | १ |
| २ | महात्मा फुले जयंती निमित्त अभिवादन | ११/४/२०२२ | १ |
| ३ | डॉ. आबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन | १३/४/२०२२ | १ |
| ४ | आंतरराष्ट्रीय योग दिवस - योगासने, प्राणायाम | २१/६/२०२२ | २ |
| ५ | जागतिक निसर्ग संवर्धन दिवस – वृक्षारोपण | २८/७/२०२२ | ३ |
| ६ | प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान | २८/७/२०२२ | ३ |
| ७ | स्वच्छता अभियान | २८/७/२०२२ | ३ |
| ८ | हर घर तिरंगा जनजागृती अभियान | ६/८/२०२२ | ४ |
| ९ | हर घर तिरंगा जनजागृतीपर प्रभात फेरी | ८/८/२०२२ | ४ |
| १० | सामुहिक राष्ट्रगीत गायन | ९/८/२०२२ | ५ |
| ११ | जागतिक आदिवासी दिनानिमित – निबंध स्पर्धा | ९/८/२०२२ | ५ |
| १२ | ऑगस्ट क्रांती दिवस | ९/८/२०२२ | ५ |
| १३ | स्वच्छता पखवाडा अंतर्गत – स्वच्छतेची शपथ | १०/८/२०२२ | ५ |
| १४ | क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव नामविस्तार दिनानिमित्त – व्याख्यान | ११/८/२०२२ | ५ |
| १५ | कॅन्सर – समुपदेशन कार्यशाळा | १२/८/२०२२ | ६ |
| १६ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित – रांगोळी स्पर्धा | १२/८/२०२२ | ६ |
| १७ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित - हर घर तिरंगा जनजागृती | १४/८/२०२२ | ६ |
| १८ | ध्वजारोहण | १५/८/२०२२ | ७ |
| १९ | सामुहिक राष्ट्रगीत गायन व ध्वज संकलन अभियान | १७/८/२०२२ | ७ |
| २० | डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिन- शिक्षक दिवस | ५/९/२०२२ | ७ |
| २१ | राष्ट्रीय पोषण सप्ताह अंतर्गत – कुपोषण निर्मुलन अभियान | ८/९/२०२२ | ८ |
| २२ | राष्ट्रीय पोषण सप्ताह अंतर्गत – कुपोषित बालकांचे सर्वेक्षण | ८/९/२०२२ | ९ |
| २३ | राष्ट्रीय पोषण सप्ताह अंतर्गत –कुपोषित बालकांना पोषण आहार वाटप | ८/९/२०२२ | १० |
| २४ | क्षयरोग (TB) मुक्त भारत अभियान अंतर्गत-क्षयरोग समुपदेशन कार्यशाळा | १६/९/२०२२ | ११ |
| २५ | कुष्ठरोग निर्मुलन अभियान अंतर्गत – कुष्ठरोग समुपदेशन कार्यशाळा | १६/९/२०२२ | १२ -१३ |
| २६ | राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त - योगासन व प्राणायाम | २४/९/२०२२ | १४ -१५ |
| २७ | राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त - स्वयंसेवक अभिमुखता कार्यशाळा | २४/९/२०२२ | १६ |
| २८ | राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त - निबंध स्पर्धा, विषय: स्वच्छता हीच खरी राष्ट्र सेवा | २४/९/२०२२ | १६ |
| २९ | राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त – Online Quize | २४/९/२०२२ | १६ |
| ३० | क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव अंतर्गत वेमन ऑऊटरीच आयोजीत – Food-Planet-Earth कार्यशाळा | २४/९/२०२२ | १६ |
| ३१ | स्वच्छता हि सेवा अभियानांतर्गत – स्वच्छता अभियान | २६/९/२०२२ | १६ |
| ३२ | धनदाई देवी मंदिर – नवरात्री उत्सव निमित्त - यात्रेतील गर्दी नियंत्रण, व्यवस्थापन आणि स्वच्छता | २६/९/२२ ते ४/१०/२२ | १७ |
| ३३ | महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती | १/१०/२०२२ | १७ |
| ३४. | स्वच्छता हि सेवा अभियानांतर्गत - श्रमदान व स्वच्छता अभियान | १/१०ते१५/१०/२०२२ | १७ |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विवरण | दिनांक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| ३५ | फिट इंडिया फ्रीडम रन ०.३ | ८/१०/२०२२ | १७ |
| ३६ | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत - प्लॅस्टिक मुक्ती कचरा अभियान | १२/१०/२०२२ | १८ |
| ३७ | डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जन्म दिवस – वाचन प्रेरणा दिवस साजरा | १५/१०/२०२२ | १८ |
| ३८ | डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जन्म दिवस – वाचन प्रेरणा दिनंनिमित्त विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा, विषय: करू या जतन वाचन संस्कृतीचे | १५/१०/२०२२ | १८ |
| ३९ | जागतिक हात धुवा दिनानिमित – दत्तक गाव अंगणवाडीत हाथ धुवा प्रात्यक्षिक व जनजागृती | १५/१०/२०२२ | १८ |
| ४० | स्वच्छता अभियान अंतर्गत - प्लॅस्टिक मुक्ती कचरा अभियान | १९/१०/२०२२ | १९ |
| ४१ | सरदार वल्लभभाई पटेल जयंती – राष्ट्रीय एकता दिवस निमित्त राष्ट्रीय एकता शपथ आयोजन | ३१/१०/२०२२ | १९ |
| ४२ | बिरसा मुंडा जयंती साजरा | १५/११/२०२२ | २० |
| ४३ | भारतीय संविधान दिनानिमित्त – राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन | २६/११/२०२२ | २० |
| ४४ | महात्मा जोतीराव फुले पुण्यतिथी निमित्त अभिवादन | २८/११/२०२२ | २० |
| ४५ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वान दिनानिमित्त अभिवादन | ६/१०/२०२२ | २० |
| ४६ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत वृक्षारोपण | ९/१२/२०२२ | २० |
| ४७ | आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिवस निमित्त – शपथ | १०/१२/२०२२ | २१ |
| ४८ | राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त अभिवादन | १२/१/२०२३ | २१ |
| ४९ | राष्ट्रीय मतदार दिवस निमित्त – जनजागृती अभियान आणि शपथ | २५/१/२०२३ | २१ |
| ५० | २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त – ध्वजवंदना व देशभक्तीपर गीत गायन आयोजन | २६/१/२०२३ | २१ |
| ५१ | विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन | ३१/१/२३ ते ६/२/२३ | २१ |
| ५२ | जागतिक महिला दिवस  निमित्त स्थानिक महिलांचा सत्कार | ८/३/२०२२ | २२ |
| ५३ | सावित्रीबाई फुले स्मृती दिन साजरा | १०/३/२०२३ | २२ |
| ५४ | महात्मा फुले जयंती निमित्त अभिवादन | ११/४/२०२३ | २२ |
| ५५ | डॉ. आबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त दहिवेल येथे व्याख्यान | १३/४/२०२३ | २२ |
| ५६ | वर्तमान पत्राची कात्रणे | | २३-३५ |

# प्रस्तावना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख दु:खाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षण मंत्री मा. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात केली.

## महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्थापना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत म्हसदी येथे आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्था, धुळे संचलित स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, ता. साक्री, जि. धुळे येथील म्हसदी गावी सन १९९८ मध्ये महाविद्यालयाची सुरुवात झाली. म्हसदी पंचक्रोशीतील ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थी विशेषतः मुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी. ग्रामीण व डोंगरी भागातील शेवटच्या घटकापर्यंत उच्च शिक्षणाची ज्ञान गंगोत्री पोहचावी. याउद्देशाने महाविद्यालय सुरु झाले. सन २००० साली महाविद्यालयाला ५० स्वयंसेवकांचे एकक सुरु करण्याची मान्यता तत्कालीन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने दिली. अशा रीतीने महाविद्यालयात सन २००० पासून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महविद्यालय, म्हसदी येथे कार्यरत आहे. कालांतराने विद्यापीठाच्या मान्यतेनुसार एककातील स्वयंसेवकांची संख्या १५० होती. **सन २०२२-२३ पासून १७० झाली आहे.** आज रोजी १७० स्वयंसेवकांचे एकक महाविद्यालयात कार्यरत आहे.

**डॉ. रमेश अहिरे**

कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

९७६३०११९९१

rc_ahire@rediffmail.com

## १. धनदाई देवी चैत्र यात्रा उत्सव निमित्त - यात्रेतील गर्दी नियंत्रण, व्यवस्थापन आणि स्वच्छता:










दर वर्षी म्हसदी येथील ग्राम दैवत आदिशक्ती धनदाई मातेची यात्रा चैत्र शुध्द पौर्णिमेला भरत असते. आदिशक्ती शक्ती धनदाई देवी अनेक कुटुंबांची कुल दैवत असल्याने मोठया संख्येने महाराष्ट्रातील व इतर राज्यातील भाविक दर्शनासाठी येतात. याच बरोबर अनेक भाविक नवस फेडण्यासाठी मोठया संख्येने येत असतात. चैत्र महिन्यात हजारोच्या संख्येने भाविक येतात. यात्रा असते. म्हणून मंदिर गाभाऱ्यात प्रचंड गर्दी असते. या गर्दीचे नियत्रण करणेसाठी व प्रत्येकाला दर्शन मिळावे आणि कोणताही गोंधळ होऊ नये. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक गर्दीच्या नियंत्रणासाठी व व्यवस्थापनासाठी १० मुले व १० मुली असे गट तयार करून मंदिरात भाविकांची रांग तयार करून दर्शनासाठी व्यवस्था करतात. यात्रे दरम्यान मंदिर परिसरात प्रचंड कचरा, घाण व प्लॅस्टिक कचरा होत असतो. स्वच्छतेसाठी व साफ सफाईसाठी स्वयंसेवक जागोजागी नेमलेले असतात. या वर्षी दि. ८ एप्रिल २०२२ ते १० एप्रिल २०२२ याकाळात स्वयंसेवकांनी हि समाज उपयोगी सेवा दिली.

## २. महात्मा फुले जयंती निमित्त अभिवादन: ११ एप्रिल २०२२

महात्मा. जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला होता. महात्मा फुले हे भारतातील एक थोर समाज सुधारक म्हणून ओळखले जातात. महात्मा फुले यांनी अश्पृशता निवारणासाठी मोठया प्रमाणात चळवळ निर्माण केली. महिलांसाठी पहिली शाळा त्यांनी त्याकाळात सुरु केली. म्हणून त्यांचे योगदान हे अतुलनीय आहे. म्हणून त्यांचा जन्मदिनी ११ एप्रिल रोजी महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळेस महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक उपस्थित होते.

## ३. डॉ. आबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन: १४ एप्रिल २०२२

भारतरत्न. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली महू येथे रोजी झाला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील एक थोर समाज सुधारक, दलितांचे कैवारी आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अश्पृशता निवारणासाठी मोठया प्रमाणात चळवळ निर्माण केली.

समाजातील वंचित घटकांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. त्यांचे योगदान हे अतुलनीय आहे. म्हणून त्यांचा जन्मदिनी १४ एप्रिल रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांची जयंती साजरा करण्यात आली. त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक आदि उपस्थित होते.

## ४. आंतरराष्ट्रीय योगा दिवस - योगासने, प्राणायाम: दि. २१ जुन २०२२

**२१ जून 'आंतरराष्ट्रीय योगा दिवस'** म्हणून साजरा करण्यात आला. या अनुषंगाने स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी येथील राष्ट्रीय सेवा योजना एककाने आपल्या सर्व स्वयंसेवकांना आपल्या गावातील नागरिक, परिसरातील नागरिक, आपल्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक किंवा मित्र परिवारासह २१ जून आंतरराष्ट्रीय योगा दिवस म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले होते. योगा व प्राणायाम करतांना **GPS कॅमेऱ्याने** फोटो काढून पाठविण्याचे सांगितले गेले. त्या अनुसार नेर ता. धुळे येथील स्वयंसेविका कु. दामिनी देवरे, देऊर ता. धुळे येथील कु. माहेश्वरी देसले, म्हसदी ता. साक्री येथील कु. योगिता देवरे, व वैन्दाने येथील कु. दीपमाला पाटील यांनी आपल्या कुटुंबातील व परिसरातील लहान मुल-मुली यांना एकत्र करून कोरोना प्रतिबंधक नियमांचे काटेकोर पालन करत योगा व प्राणायाम यांचे आयोजन करून योगा व प्राणायाम करत असतांना GPS कॅमेऱ्याने फोटो काढून ग्रुपवर सादर केले ते आपणास अहवाला सोबत पाठवीत आहोत. तसेच महाविद्यालयात सकाळी ८ ते ९ वाजे दरम्यान योगासन व प्राणायाम घेण्यात आले. यात महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. याठिकाणी हि कोरोना प्रतिबंधक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात आले. योगा व प्राणायाम करत असतांना GPS कॅमेऱ्याने फोटो काढण्यात आले. कार्यक्रमाच्या आयोजना बद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार यांनी केले.












## ५. जागतिक निसर्ग संवर्धन दिवस – वृक्षारोपण: २८ जुलै २०२२

जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त दत्तक गाव म्हसदी येतील धनदाई देवी मंदीर परिसरात आणि धनदाई डोंगर परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. याप्रसंगी शासनाच्या आदेशानुसार म्हसदी गावातील ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी, कर्मचारी तसेच म्हसदी गावातील सर्व प्राथमिक शाळेचे शिक्षक, म्हसदी येथील प्राथमिक उपचार केंद्रातील सर्व कर्मचारी आणि गावातील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती धनदाई तरुण ऐक्य मंडळाचे सर्व संचालक आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक इत्यादी उपस्थित राहून मोठया प्रमाणात झाडे लावण्यात आली. म्हसदी गावातील निसर्ग प्रेमी श्री. सुभान पिंजारी हे देखील यावेळेस उपस्थित राहून वृक्षरोपनात सहभागी झाले. या वेळेस १०० पेक्षा जास्त झाडे लावण्यात आली.



## ६. प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान: २८ जुलै २०२२

जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त दत्तक गाव म्हसदी येतील धनदाई देवी मंदीर परिसरात आणि धनदाई डोंगर परिसरात प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी शासनाच्या आदेशानुसार म्हसदी गावातील ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी, कर्मचारी तसेच म्हसदी गावातील सर्व प्राथमिक शाळेचे शिक्षक, म्हसदी येथील प्राथमिक उपचार केंद्रातील सर्व कर्मचारी आणि गावातील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती धनदाई तरुण ऐक्य मंडळाचे सर्व संचालक आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक इत्यादी उपस्थित होते. यांच्या साक्षीने धनदाई मंदिर परिसरात प्लॅस्टिकचा कचरा साचलेला होता. स्वयंसेवकांनी सर्व परिसर स्वच्छ केला. याप्रसंगी १०० किलो पेक्षा जास्त प्लॅस्टिक कचरा गोळा करून त्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

## ७. स्वच्छता अभियान: २८ जुलै २०२२

जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त दत्तक गाव म्हसदी येतील धनदाई देवी मंदीर परिसरात आणि धनदाई डोंगर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. धनदाई मंदिर परिसरात मोठया प्रमाणात घाण साचलेली होती. स्वयंसेवकांनी सर्व परिसर स्वच्छ केला.

## ८. हर घर तिरंगा जनजागृती अभियान: ६ ऑगस्ट २०२२

भारतीय स्वातंत्र्याला १५ ऑगस्ट २०२२ रोजी भारताच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष असल्याने, २०२२ हे वर्ष स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात यावे, असे आदेश केंद्र शासनाने सर्व राज्यांना दिले. या अंतर्गत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहाने साजरा व्हावा, या उद्देशाने प्रत्येक घरावर तिरंगा हा भारताचा राष्ट्रध्वज लावण्यात यावा. या उद्देशाने हर घर तिरंगा हे राष्ट्रीय अभियान राबविण्यात आले. त्या अंतर्गत आमच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाने हर घर तिरंगा जनजागृती अभियान दि. ६ ऑगस्ट २०२२ रोजी राबविण्यात आले. या अंतर्गत म्हसदी गावातील सर्व प्राथमिक शाळा, विद्यालय व माध्यमिक विद्यालयात भारतीय राष्ट्रध्वजाची माहिती व ध्वज संहिता याविषयीची माहितीपर कार्यक्रम महाविद्यालयाचे क्रिडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांच्या मार्गदर्शनाने देण्यात आली. राष्ट्रध्वज कसा फडकवावा. राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही. याविषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सदर कार्यक्रमास सुमारे ३०० पेक्षाजास्त विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्येकाने आपल्या घरावर दि. १३ ऑगस्ट ते दि. १५ ऑगस्ट २०२२ पर्यंत राष्ट्रध्वज तिरंगा लावावा. अशी सूचना देण्यात आली.



## ९. हर घर तिरंगा जनजागृती प्रभात फेरी: ८ ऑगस्ट २०२२

भारताचा राष्ट्रध्वज प्रत्येकाने आपल्या घरावर लावावा. तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहाने साजरा करण्याच्या उद्देशाने हर घर तिरंगा या राष्ट्रीय अभियान अंतर्गत आमच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाने हर घर तिरंगा जनजागृतीपर प्रभातफेरीचे आयोजन केले. दि. ८ ऑगस्ट २०२२ रोजी, सकाळी ८:०० ते १०:०० या कालावधीत दत्तक गावात प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. या अंतर्गत स्वयंसेवकांनी राष्ट्रध्वज तिरंगा हाती घेऊन "हर घर तिरंगा, हर घर तिरंगा" असे नारे देत दत्तक गावात प्रभातफेरी काढली. दत्तक गावातील महिला सरपंच सौ. शैलेजा देवरे व ग्रामपंचायत अधिकारी श्री. मेघश्याम बोरसे यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले. या प्रभात फेरीत एकूण १४५ स्वयंसेवक सहभागी झाले.

## १०. सामुहिक राष्ट्रगीत गायन: ९ ऑगस्ट २०२२

९ ऑगस्ट रोजी शासनाच्या आदेशाचे पालन करून महाविद्यालयाच्या प्रांगणात "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत सामुहिक राष्ट्रगीत गायन सकाळी ठीक ११:०० वा. घेण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील १५० विद्यार्थी व ३५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले.

## ११. जागतिक आदिवासी दिनानिमित्त विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा: ९ ऑगस्ट २०२२

दि. ९ ऑगस्ट, हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक आदिवासी दिवस आणि ऑगस्ट क्रांती दिवस म्हणून साजरा केला जातो. वर्ष २०२२ हे भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा होत आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी जनतेचे मोठे योगदान आहे. म्हणून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाचे औचित्य साधून जागतिक आदिवासी दिनी "खान्देशातील आदिवासी: कला आणि संस्कृती" या विषयावर विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कु. योगिता सुरेश मोरे (प्रथम), दिपक भामरे (द्वितीय) आणि अमन निकवाडे (तृतीय) आले. या स्पर्धेत विद्यापीठ स्तरातून एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

## १२. ऑगस्ट कांती दिवस: ९ ऑगस्ट २०२२

९ ऑगस्ट, हा दिवस ऑगस्ट क्रांती दिवस म्हणून साजरा केला जातो. वर्ष २०२२ हे भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा होत आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ज्या क्रांतीकारकांनी योगदान दिले. आपले बलिदान दिले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाचे औचित्य साधून सर्व क्रांतीकारींना अभिवादन करण्यात आले.

## १३. स्वच्छता पंधरवडा अंतर्गत - स्वच्छतेची शपथ: १० ऑगस्ट २०२२

दर वर्षी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत संपूर्ण भारतात दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत स्वच्छता पंधरवडा साजरा केला जातो. २०२२ हे वर्ष स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव वर्ष म्हणून साजरे होत असल्याने दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी, सकाळी ९:१५ वा. स्वच्छतेची सामुहिक शपथ घेण्यात आली. व दत्तक गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात १२० स्वयंसेवक सहभागी होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आणि स्वयंसेवक मोठयासंख्येने उपस्थित होते.

## १४. क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा - व्याख्यानाचे आयोजन: ११ ऑगस्ट २०२२

दि. ११ ऑगस्ट, २०१८ रोजी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव असे नाम विस्तार करण्यात आले, म्हणून दर वर्षी दि. ११ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण विद्यापीठात नामविस्तार दिवस म्हणून साजरा केला जातो. वर्ष २०२२ हे भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा होत असल्याने. नामविस्तार दिन सुध्दा उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्षाचे औचित्य साधून विद्यापीठ नामविस्तार दिनी विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "बहिणाबाई यांचे जीवन दर्शन" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख व्याख्याते म्हणून मराठी विभागाचे प्रमुख व रासेयो, धुळे जिल्हा, माजी समन्वयक डॉ. वाल्मिक आढावे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रमास ३० शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि १३० स्वयंसेवक उपस्थित होते.

## १५. कॅन्सर – समुपदेशन कार्यशाळा व रांगोळी स्पर्धा : १२ ऑगस्ट २०२२

कॅन्सर अर्थात कर्करोग आजही जगासमोर एक जीवघेणी समस्या आहे. हजारो लोक दरवर्षी कर्करोगामुळे मृत्यू पावतात. आज हि जनमानसात कर्करोगाबद्दल जागरूकता नाही. जनजागृतीचा उद्देशाने नागपूर येथील स्टॉप कॅन्सर मिशन बहुउद्देशीय सोसायटी आणि आरोग्यधन लाईफस्त स्टाईल व राष्ट्रीय सेवा योजना एकक म्हसदी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १२ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ९:२० वा. कॅन्सर समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. नागपूर येथील स्टॉप कॅन्सर मिशन बहुउद्देशीय सोसायटीचे श्री जीवन माळी हे समुपदेशक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, प्रमुख अतिथी म्हणून धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष मा. दादासाहेब श्री. सुभाष देवरे, उपाध्यक्ष, अण्णासाहेब श्री. के. एन. देवरे हे उपस्थित होते. कार्यक्रमास ३० शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि १२५ स्वयंसेवक उपस्थित होते.




## १६. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षा निमित्त - रांगोळी स्पर्धा : १२ ऑगस्ट २०२२

म्हसदी येथील ग्रामपंचायत कार्यालयाने ग्रामपंचायतच्या प्रांगणात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव वर्ष निमित्त "हर घर तिरंगा अभियान" अंतर्गत सामाजिक, आरोग्य, आर्थिक आणि राष्ट्रीय विषयांवर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत रासेयो एककातील १५ स्वयंसेविका सहभागी झाल्या.

## १७. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित - हर घर तिरंगा जनजागृती: १४ ऑगस्ट २०२२

भारताचा राष्ट्रध्वज प्रत्येकाने आपल्या घरावर लावावा. तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहाने साजरा करण्याच्या उद्देशाने हर घर तिरंगा या राष्ट्रीय अभियान अंतर्गत दि. १४ ऑगस्ट २०२२ रोजी, सकाळी ८:०० ते १०:०० या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना एककातील १३५ स्वयंसेवक स्वयंसेविका आणि महाविद्यालयातील ४० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी राष्ट्रीय ध्वज तिरंगा आपल्या छाती समोर घेऊन फोटो काढले आणि ते फोटो सोशल मिडीयावर

स्टेटस म्हणून ठेवले. महाविद्यालयाचे सर्व सोशल मिडिया अकाऊंटवर शेअर करून जनजागृतीपर अभियान राबविले. सर्व फोटो  शासनाच्या पोर्टलवर फोटो अपलोड करण्यात आले.

## १८. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित – ध्वजारोहण – मानवंदना : १५  ऑगस्ट २०२२

दि१५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. १५ ऑगस्ट २०२२ ला भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत असल्याने २०२२ हे वर्ष स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात आले. केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार वर्षभर अनेक कार्यक्रम राबविण्यात आले.

सन २०२२ चा १५ ऑगस्ट हा स्वातंत्र्य दिवस हा विशेष उत्साहाचा होता. हा दिवस मोठया उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयाच्या प्रांगणात संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. दादासाहेब संजयकुमार देवरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी भारतीय सेनेतून निवृत्त झालेले श्री. अमोल देवरे यांना देखील आमंत्रित करण्यात आले होते. श्री. अमोल देवरे हे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. म्हणून त्यांचा सत्कार मा. अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे १५०  स्वयंसेवक, २५  शिक्षक आणि १० शिक्षकेत्तर कर्मचारी रासेयो दत्तक गांव म्हसदी येथील ग्रामपंचायत प्रांगणात सार्वजनिक ध्वजारोहणासाठी हजर झाले.

## १९. सामुहिक राष्ट्रगीत गायन व ध्वज संकलन अभियान : १७ ऑगस्ट २०२२

शासनाच्या आदेशाचे पालन करून महाविद्यालयाच्या प्रांगणात "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत सामुहिक राष्ट्रगीत गायन सकाळी ठीक ११:०० वा. घेण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील १५० विद्यार्थी व ३५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले.

दि. १५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. १५ ऑगस्ट २०२२ ला भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत असल्याने २०२२ हे वर्ष स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करण्यात आले. भारतीय केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार वर्षभर अनेक कार्यक्रम राबविण्यात आले.

दि. १५ ऑगस्ट, २०२२ रोजी शासनाच्या आदेशाचे पालन करून महाविद्यालयाच्या प्रांगणात "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत सर्व नागरिकांनी आपापल्या घरावर, दुकानावर दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ असे सतत तीन दिवस राष्ट्र ध्वज तिरंगा लावला होता. राष्ट्र ध्वजाचा अपमान होऊ नये. म्हणून दत्तक गावात घरोघरी जाऊन ध्वज संकलन साठी रासेयो स्वयंसेवकांना प्रेरित करण्यात आले. यासाठी महाविद्यालयातील क्रिडा विभागाचे संचालक, डॉ. जगदीश तोरवणे यांनी ध्वज संकलन कसे करावे? ध्वजाची घडी कशी करावी? ध्वज संकलन करुन तो कुठे? जमा करावा. याविषयीचे मार्गदर्शन प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या उपक्रमात ४५ स्वयंसेवक सहभागी झाले.

## २०. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जन्मदिन- शिक्षक दिवस : ५ सप्टेंबर २०२२

दर वर्षी ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिवस म्हणून संपूर्ण भारतभर साजरा करण्यात येतो. दि. ५ सप्टेंबर १८८८ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती स्व. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म झाला होता. शिक्षक ते भारताचे राष्ट्रपती पदा पर्यंत त्यांची वाटचाल, विचार व राष्ट्रभक्ती हि प्रेरणादाई आहे. म्हणून त्यांचा कानं दिवस शिक्षक दिवस म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे. शिक्षक दिनाच्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनाच्या एककाने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून साजरा केला. प्रतिमा पूजनमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी यादरम्यान डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे जीवन व कार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी व त्यांचे

सहकारी यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

## २१. राष्ट्रीय पोषण सप्ताह अंतर्गत – कुपोषण निर्मुलन अभियान : ८ सप्टेंबर २०२२

दरवर्षी सप्टेंबर महिन्यात राष्ट्रीय पोषण माह साजरा होत असतो. या अभियाना अंतर्गत भारतात प्रत्येक राज्यात पोषण आहाराविषयी जनजागृती होत असते. भारतात अजुनही कुपोषणाचे प्रमाण बरेच आहे. प्रामुख्याने आदिवासी वस्तीत हे प्रमाण जास्त आढळते. राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत दत्तक गावात दिनांक ८ सप्टेंबर २०२२ रोजी कुपोषित माहिती मिळविण्यात आली. यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली. याच बरोबर दत्तक गावातील आशा सेविका व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मदतीने दत्तक गावातील कुपोषित बालकांचे पालक, आई आणि वडील यांना पोषण आहार विषयी माहिती देण्यात आली. बालकांच्या सुदृढतेसाठी कोणकोणती काळजी घ्यावी, कोणता सकस आहार द्यावा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## २२. राष्ट्रीय पोषण सप्ताह अंतर्गत – कुपोषित बालकांचे सर्वेक्षण : ८ सप्टेंबर २०२२




दरवर्षी सप्टेंबर महिन्यात राष्ट्रीय पोषण माह साजरा होत असतो. या अभियाना अंतर्गत भारतात प्रत्येक राज्यात पोषण आहाराविषयी जनजागृती होत असते. भारतात अजुनही कुपोषणाचे प्रमाण बरेच आहे. प्रामुख्याने आदिवासी वस्तीत हे प्रमाण जास्त आढळते. राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत दत्तक गावात दिनांक ८ सप्टेंबर २०२२ रोजी कुपोषित बालकांचे सर्वेक्षण आयोजन करण्यात आले. यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली. याच बरोबर दत्तक गावातील आशा सेविका व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मदतीने दत्तक गावातील अंगणवाडीतील मुलांचे सर्वेक्षण हाती घेण्यात आले. यात प्रामुख्याने आदिवासी वस्तीतील अंगणवाडीतील बालकांचे सर्वेक्षण करण्यात आले. यात अंगणवाडी क्र. ४ मधील पाच (५) मुले कुपोषित आढळली. या मुलांची संपूर्ण माहिती प्रश्नावलीत नमूद करण्यात आली. यासाठी स्वयंसेवक व स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली होती. या सर्वेक्षण दरम्यान कुपोषित बालकांचे पालक, आई आणि वडील यांना पोषण आहार विषयी माहिती देण्यात आली. बालकांच्या सुदृढतेसाठी कोणकोणती काळजी घ्यावी, कोणता सकस आहार द्यावा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

॥ ज्ञानदीप लावू जगी॥

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे

# स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे, कला व विज्ञान महाविद्यालय

## म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

(नॅक मुल्यांकन B ग्रेड, CGPA - 2.41)

# N S S

## NOT ME BUT YOU

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# राष्ट्रीय पोषण सप्ताह

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# कुपोषण मुक्ती अभियान




















## दि. ८ सप्टेंबर 2022

## राष्ट्रीय पोषण सप्ताह अंतर्गत

### कुपोषित बालक सर्वेक्षण आणि सकस पोषण आहार वाटप

## २३. राष्ट्रीय पोषण सप्ताह अंतर्गत – कुपोषित बालकांना पोषण आहार वाटप : ८ सप्टेंबर २०२२

राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत दत्तक गावात दिनांक ८ सप्टेंबर २०२२ रोजी कुपोषण मुक्ती अभियान अंतर्गत कुपोषित बालकांचे सर्वेक्षण करून पोषण आहाराचे वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यासाठी एक दत्तक गावातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मदतीने दत्तक गावातील अंगणवाडीतील कुपोषित मुलांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. यात प्रामुख्याने आदिवासीवस्तीतील अंगणवाडीतील बालकांचा समावेश होता. यात अंगणवाडी क्र. ४ मधील पाच (५) मुले कुपोषित बालक व इतर बालकांना सकस आहार वाटप स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. या दरम्यान कुपोषित बालकांचे पालक, आई आणि वडील यांना पोषण आहार विषयी माहिती देण्यात आली. बालकांच्या सुदृढतेसाठी कोणकोणती काळजी घ्यावी, कोणता सकस आहार द्यावा याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.


## २४. क्षयरोग (TB) मुक्त भारत अभियान अंतर्गत-क्षयरोग समुपदेशन कार्यशाळा : १६ सप्टेंबर २०२२

दरवर्षी सप्टेंबर महिन्यात भारतात क्षयरोग मुक्त भारत अभियान राबविले जाते. कारण आज हि भारतात क्षयरोग रुग्णांची संख्या खूप आहे. प्रामुख्याने आदिवासी भागात व वस्तीत हे प्रमाण जास्त आढळते. दत्तक गावात आदिवासी वस्ती असल्याने व आदिवासी लोकांची संख्या बऱ्यापैकी असल्याने क्षयरोग विषयी जनजागृती निर्माण व्हावी. शासनाच्या क्षयरोग निर्मुलन अभियान यशस्वीपणे राबविण्यात हातभार लागावा याउद्देशाने दि. १६ सप्टेंबर २०२२ रोजी साक्री येथील आरोग्य पथक व म्हसदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या सहकार्याने महाविद्यालयात TB (क्षयरोग) मुक्त भारत अभियान अंतर्गत, क्षयरोग निवारण समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत साक्री येथील क्षयरोग निवारण आरोग्य पथकाचे निरीक्षक श्री. भूषण बैसाणे यांनी क्षयरोग विषयी माहिती सदर केली. क्षयरोगाची करणे, लक्षणे, परिणाम आणि उपाय याविषयी मार्गदर्शन केले. क्षयरोग विषयी ग्रामीण भागातील जनतेत असलेल्या गैरसमजुती व निष्काळजी याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. क्षयरोग पूर्णपणे बरा होणारा आजार आहे. याविषयी जनजागृतीची गरज आहे. असे हि आवाहन केले. याच बरोबर साक्री येथील क्षयरोग निवारण आरोग्य पथकाचे निरीक्षक श्री. अजय पवार व म्हसदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, औषधीनिर्माण अधिकारी, श्री. दिलीप बोरसे यांचेपण मार्गदर्शन लाभले. या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील हे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी धुळे जिल्हा समन्वयक डॉ. वाल्मिक आढावे, साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील हे उपस्थित होते. कार्य्कार्माचे आयोजन व सूत्र संचलन कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. कार्यशाळेला ४८ स्वयंसेवक व ५४ स्वयंसेविका उपस्थित होते.

## २५. कुष्ठरोग निर्मुलन अभियान अंतर्गत – कुष्ठरोग समुपदेशन कार्यशाळा : १६ सप्टेंबर २०२२

भारतात दरवर्षी सप्टेंबर महिन्यात कुष्ठरोग निर्मुलन अभियान राबविले जाते. या अभियानांतर्गत साक्री येथील आरोग्य पथक व म्हसदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या सहकार्याने कुष्ठरोग निर्मुलन अभियानांतर्गत कुष्ठरोग निवारण जनजागृतीपर समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. दत्तक गावात कुष्ठरोग विषयी जनजागृती निर्माण व्हावी. शासनाच्या कुष्ठरोग निर्मुलन अभियान यशस्वीपणे राबविण्यात हातभार लागावा याउद्देशाने दि. १६ सप्टेंबर २०२२ रोजी साक्री येथील आरोग्य पथक व म्हसदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या सहकार्याने महाविद्यालयात कुष्ठरोग निर्मुलन अभियान अंतर्गत, कुष्ठरोग निवारण जनजागृतीपर समुपदेशन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत साक्री येथील कुष्ठरोग निवारण आरोग्य पथकाचे निरीक्षक श्री. अजय पवार यांनी कुष्ठरोग विषयी माहिती सदर केली. कुष्ठरोगाची करणे, लक्षणे, परिणाम आणि उपाय याविषयी मार्गदर्शन केले. कुष्ठरोग विषयी ग्रामीण भागातील जनतेत असलेल्या गैरसमजुती व निष्काळजी याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. कुष्ठरोग विषयी जनजागृतीची गरज आहे. असे हि आवाहन केले. याच बरोबर

साक्री येथील कुष्ठरोग निवारण आरोग्य पथकाचे निरीक्षक श्री. भूषण बैसाणे व म्हसदी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, औषधीनिर्माण अधिकारी, श्री. दिलीप बोरसे यांचेपण मार्गदर्शन लाभले. प्रत्येक शाळा महाविद्यालयात आरोग्य शिक्षण सक्तीचे करावे असे प्रतिपादन श्री. दिलीप बोरसे यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील हे उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी धुळे जिल्हा समन्वयक डॉ. वाल्मिक आढावे, साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील हे उपस्थित होते. कार्य्कार्माचे आयोजन व सूत्र संचलन कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. कार्यशाळेला ४८ स्वयंसेवक व ५४ स्वयंसेविका उपस्थित होते.










राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम जिल्हा- धुळे
कला व विज्ञान महाविद्यालय
TB(क्षयरोग)


राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम जिल्हा- धुळे


राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम जिल्हा- धुळे
भारत अभियान
कुष्ठरोग निर्मूलन


TB(क्षयरोग) मुक्त
भारत अभियान
व
कुष्ठरोग निर्मूलन









## २६. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त योगासन व प्राणायाम: २४ सप्टेंबर २०२२


राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष १९६९ पासून अंमलात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी. समाजाच्या सुख दु:खाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी. सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी. तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी. या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी










वर्षानिमित्ताने २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षण मंत्री मा. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात केली. म्हणून दर वर्षी २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात येतो. रा.से.यो. एककाने महाविद्यालयात योगासने, प्राणायाम घेतली. यात रा.से.यो.चे सर्व स्वयंसेवक, स्वयंसेविका, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




आज़ादी का अमृत महोत्सव










राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME







# NOT ME BUT YOU

## २७. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त स्वयंसेवक अभिमुखता कार्यशाळा : २४ सप्टेंबर २०२२

दर वर्षी २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात येतो. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष १९६९ पासून अंमलात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख दु:खाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त स्वयंसेवक अभिमुखता कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. रा.से.यो.ने अंतर्गत नियमित कार्यक्रम व सात दिवसीय निवासी शिबीर असे असे वर्षाचे नियोजन असते. नियमित कार्यक्रमातून दत्तक गावात जनजागृतीपर अनेक कार्यक्रम राबविले जातात. सहिष्णुता, सर्वधर्म समभाव, राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम निर्माण व्हावी असे नियमित कार्यक्रम घेतले जातात. सात दिवसीय निवासी शिबिरात निर्मलग्राम, स्वच्छता अभियान, पर्यावरण जनजागृती, वृक्षारोपण, आरोग्य जनजागृती, श्रमदान, रक्तदान, पथनाट्य पाणी आडवा, पाणी जिरवा, रस्ते बांधणी, ग्राम विकास आणि अंधश्रद्धा निर्मुलन करणारे असे अनेक कार्यक्रम शिबिरात घेतले जातात. कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यशाळेला सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदि उपस्थित होते.

## २८. निबंध स्पर्धा, विषय: स्वच्छता हीच खरी राष्ट्र सेवा: दि. २४ सप्टेंबर २०२२

दि. २४ सप्टेंबर राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त महाविद्यालयीन स्तरावर 'स्वच्छता हीच खरी राष्ट्र सेवा' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक काढण्यात आले. सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आली.

## २९. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस अंतर्गत - एन.एस.एस. (online Quize): दि. २४ सप्टेंबर २०२२

राष्ट्रीय सेवा योजनेचे औचित्य साधून स्वयंसेवकामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची माहितीची उजळणी व्हावी म्हणून google form वर online पद्धतीने Quize घेण्यात आली. या Quize मध्ये २० प्रश्न देण्यात आली. Quize पूर्ण करून submit केल्यावर सहभागी स्वयंसेवकाच्या मेलवर प्रमाणपत्र मिळेल याची सोय करण्यात आली. या Quize मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला व महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदविला.

## ३०. क.ब.चौ.उ.म.वि. जळगाव अंतर्गत वेमन ऑऊटरीच आयोजीत – Food-Planet-Earth कार्यशाळा: दि. २४ सप्टेंबर २०२२

दि. २४ सप्टेंबर, २०२२ रोजी संध्याकाळी ठीक ५:३० वा. क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व Vegan Outreach Institution यांच्या संयुक्त विद्यमाने "फूड-प्लॅनेट-हेल्थ" या विषयावर ऑनलाईन वेबिणार घेण्यात आला. यात महाविद्यालयातील १२० सहभागींनी सहभाग नोंदविला हा वेबिणार राष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात आला होता. यात महाराष्ट्रातील व इतर राज्यातील अनेक महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

## ३१. स्वच्छता हि सेवा अभियानांतर्गत – स्वच्छता अभियान: दि. २६ ते ३० सप्टेंबर २०२२

केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशान्वये दर वर्षी सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात स्वच्छता अभियान राबविले जाते. स्वच्छता अभियानांतर्गत **'स्वच्छता ही सेवा'** या थीम अंतर्गत स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविले गेले. दर वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेची प्रवेश प्रक्रिया राबवावी लागते. प्रवेश प्रक्रिया राबवीत असतांना. राष्ट्रीय सेवा योजनेते प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या स्वयंसेवकांना श्रमदानाचे महत्व समजावे. स्वच्छता आणि श्रमदान हि राष्ट्रीय सेवा योजनेची प्रमुख अंगे आहेत. हे अधोरेखित करत असतांना स्वयंसेवकांमध्ये श्रमदानाचे मूल्य

रुजविण्यासाठी महविद्यालय परिसरात श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. हे अभियान दि. **२६ सप्टेंबर** पासून सुरु करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेची प्रवेश प्रक्रिया पूर्ण  होईपर्यंत सुरु ठेवण्यात आली. त्या-त्या दिवशी जेवढे स्वयंसेवक प्रवेश अर्ज घेण्यासाठी आले त्यांना महाविद्यालय परिसरात श्रमदान व  स्वच्छता अभियानात समाविष्ठ करण्यात आले. या अभियानांतर्गत महाविद्यालयाचा खूप मोठा परिसर  स्वच्छ करण्यात आला.

### ३२. धनदाई देवी मंदिर - नवरात्री उत्सव निमित्त - यात्रेतील गर्दी नियंत्रण, व्यवस्थापन आणि स्वच्छता: दि. २९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२२

दर वर्षी म्हसदी येथील ग्राम दैवत आदिशक्ती धनदाई मातेचा नवरात्रीला उत्सव असतो. आदिशक्ती शक्ती धनदाई देवी अनेक कुटुंबांची कुल दैवत असल्याने मोठया संख्येने महाराष्ट्रातील व इतर राज्यातील भाविक दर्शनासाठी येतात. याच बरोबर अनेक भाविक नवस फेडण्यासाठी मोठया संख्येने येत असतात. नवरात्रीच्या काळात हजारोच्या संख्येने भाविक येतात. यात्रा असते. म्हणून मंदिर गाभाऱ्यात प्रचंड गर्दी असते. या गर्दीचे नियत्रण करणेसाठी व प्रत्येकाला दर्शन मिळावे आणि कोणताही गोंधळ होऊ नये. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक गर्दीच्या नियंत्रणासाठी व व्यवस्थापनासाठी १० मुले व १० मुली असे गट तयार करून मंदिरात भाविकांची रांग तयार करून दर्शनासाठी व्यवस्था करतात. याकाळात मंदिर परिसरात प्रचंड कचरा, घाण व प्लॅस्टिक कचरा होत असतो. स्वच्छतेसाठी व साफ सफाईसाठी स्वयंसेवक जागोजागी नेमलेले असतात. याकाळात स्वयंसेवकांनी हि समाज उपयोगी सेवा दिली.

### ३३. महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती दि. १ ऑक्टोबर २०२२

दर वर्षी २ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरा करण्यात येते. यावर्षी एक दिवस अगोदर म्हणजेच १ ऑक्टोबरला महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो चे स्वयंसेवक उपस्थित होते.

### ३४. स्वच्छता हि सेवा अभियानांतर्गत - श्रमदान व स्वच्छता अभियान दि. ०१ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२२

दर वर्षी ऑक्टोबर महिन्यात दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासन यांच्या अंतर्गत स्वच्छतेचे विविध उपक्रम राबविण्यात येतात. या वर्षी स्वच्छता हि सेवा हे अभियान राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या एककाने स्वच्छता हि सेवा या अभियानांतर्गत महाविद्यालय परिसरात दिनांक १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर याकाळात सतत पंधरा दिवस स्वयंसेवकांचे श्रमदान घेण्यात आले. पावसामुळे महाविद्यालय परिसरात मोठयाप्रमाणात सर्वत्र गवत उगलेले असते. संपूर्ण महाविद्यालय परिसर गवताने अच्छादलेले असते. महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्याच्या हेतूने व नवीन प्रवेशित झालेल्या स्वयंसेवकांमध्ये श्रमदानाचे मूल्य रुजावे म्हणून श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. याकाळात रोज दहा ते बारा स्वयंसेवकांनी आपल्या श्रमदानातून महाविद्यालयाचा सर्व परिसर स्वच्छ केला.

### ३५. फिट इंडिया फ्रीडम रन ०.३ दि. ८ ऑक्टोबर २०२२

मागील तीन वर्षापासून ऑक्टोबर महिन्यात दिनांक ८ ऑक्टोबर रोजी फिट इंडिया फ्रीडम रन अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासन यांच्या मार्गदर्शन सुनचनेनुसार फिट इंडिया रनचे आयोजन करण्यात येते. या वर्षी फिट इंडिया फ्रीडम रन ०.३ राबविण्यात आले. अभियानांतर्गत महाविद्यालय परिसरात स्वयंसेवकांचे रनचे आयोजन करण्यात आले. स्वयंसेवकांमध्ये आरोग्याचे व व्यायामाचे मूल्य रुजावे म्हणून हे अभियान राबविण्यात येते. यात स्वयंसेवकांनी चांगला प्रतिसाद दिला.

## ३६. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत - प्लॅस्टिक मुक्ती कचरा अभियान: १२ ऑक्टोबर २०२२

केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशान्वये स्वच्छता अभियानांतर्गत **'स्वच्छ भारत अभियान'** अंतर्गत स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविले गेले. स्वयंसेवकांमध्ये श्रमदानाचे मूल्य रुजविण्यासाठी महाविद्यालय परिसरात श्रमदानातून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दत्तक गावातील आदिवासी वस्तीत प्लॅस्टिक कचरा गोळा करण्यात आला. या अभियानांतर्गत दत्तक गावातील आदिवासी वस्तीतील खूप मोठा परिसरातून प्लॅस्टिक कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. प्लॅस्टिकच्या वस्तू, बॅग्स, बाटली आणि पिशव्या वापरू नये. अशी जनजागृती करण्यात आली.

## ३७. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जन्म दिवस – वाचन प्रेरणा दिवस साजरा: दि. १५ ऑक्टोबर २०२२

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन देशभरात वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांची पुस्तके वाचावीत, त्याचबरोबर इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे असे मार्गदर्शन उपप्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने वाचन प्रेरणा दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाने डॉ. कलाम यांचे मौलिक विचारांचे वाचनाचे आयोजन केले. १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून उत्साहात साजरा केला. या प्रसंगी डॉ. अब्दुल कलाम यांचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

## ३८. डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जन्म दिवस – वाचन प्रेरणा दिनंनिमित्त विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धा, विषय: करू या जतन वाचन संस्कृतीचे दि. १५ ऑक्टोबर २०२२


भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन देशभरात वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, या दृष्टीने वाचन प्रेरणा दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाने 'करू या जतन वाचन संस्कृतीचे' या विषयावर विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले. या स्पर्धेत महाविद्यालयातील व इतर महाविद्यालयातील२४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील सहभागांपैकी उत्कृष्ठ प्रथम,द्वितीय आणि तृतीय निबंधांची निवड करण्यात आली. सर्वांना सहभाग प्रमाण पत्रांचे वाटप करण्यात आले.

## ३९. जागतिक हात धुवा दिनानिमित – दत्तक गाव अंगणवाडीत हाथ धुवा प्रात्यक्षिक व जनजागृती: १५ ऑक्टोबर २०२२

दिनांक १५ ऑक्टोबर २०२० रोजी 'जागतिक हात धुवा दिन' साजरा करण्यात आला. कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेबाबतच्या सर्व आवश्यक सवयींचे पालन करणे आवश्यक आहे. यानिमित्ताने जागतिक हात धुवा दिन साजरा करण्याच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये याबाबतची जाणीवजागृती करण्याच्या उद्देशाने कोरोना संसर्ग टाळण्यासाठी मास्क लावणे, वारंवार हात स्वच्छ करणे किती आवश्यक आहे याचे महत्व पटवून देण्यात करिता दत्तक गावातील अंगणवाडीतील मुलांना हात स्वच्छ कसे धुवावेत याचे प्रात्यक्षिक स्वयंसेवकांनी सादर करून आरोग्य जनजागृती केली. जागतिक हात धुवा दिनाच्या निमित्ताने संसर्गजन्य आजारांपासून बचाव कसा होऊ शकतो या दृष्टीने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने महाविद्यालयात हात धुण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य, डॉ. शिवाजी पाटील यांनी आरोग्य संवर्धनात स्वच्छ हातांची भूमिका अधोरेखित करत ज्या कामात हातावर जीवाणू, विषाणू, व घाण लागण्याची शक्यता असते, असे प्रत्येक काम केल्यावर व बाहेरून घरी आल्यावर साबणाने हात स्वच्छ धुतले कि अनेक जीवघेण्या संसर्गजन्य आजारांपासून स्वत:चे रक्षण करता येते असे सांगितले. दर एक तासाने आपले हात स्वच्छ धुतले पाहिजे. हात धुण्याची प्रक्रिया २० सेकंदात पुर्ण होणे आवश्यक असल्याची माहिती विध्यार्थ्यांना करून देण्यात आली. याचबरोबर स्वच्छ हात धुण्याविषयी समाजामध्ये जनजागृती करावी असे स्वयंसेवकांना आवाहन करण्यात आले.

## ४०. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत - प्लॅस्टिक मुक्ती कचरा अभियान: दि. १९ ऑक्टोबर २०२२

स्वच्छता अभियानांतर्गत **'स्वच्छ भारत अभियान व प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान'** अंतर्गत रा.ससे.यो. स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी आणि धुळे येथील नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता व प्लॅस्टिक कचरा मुक्ती अभियान म्हसदी या दत्तक गावातील आठवडे बाजाराच्या ठिकाणी राबविले गेले. याप्रसंगी




आठवडे बाजारातील परिसरातून १०० किलो पेक्षा जास्त प्लॅस्टिक कचरा गोळा करण्यात आला. आठवडे बाजार परिसरात प्रचंड घाण साचलेली होती ती हि स्वयंसेवकांनी स्वच्छ केली. आठवडे बाजाराचा पूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला.

## ४१. सरदार वल्लभभाई पटेल जयंती - राष्ट्रीय एकता दिवस निमित्त राष्ट्रीय एकता शपथ: ३१ ऑक्टोबर २०२२

लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती देशभरात राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात येते. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकतेची भावना निर्माण व्हावी या दृष्टीने राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाने

महाविद्यालयात राष्ट्रीय एकतेची सामुहिक शपथचे आयोजन केले. ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस उत्साहात साजरा केला. या प्रसंगी लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून राष्ट्रीय एकतेची शपथ घेण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक आदि उपस्थित होते.

## ४२. बिरसा मुंडा जयंती साजरा: दि. १५ नोव्हेंबर २०२२

दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस थोर स्वातंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांचा जन्म दिवस साजरा करण्यात येतो. थोर आदिवासी स्वातंत्र्य सेनानी स्वातंत्र्य सेनानी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक आदि उपस्थित होते.

## ४३. भारतीय संविधान दिनानिमित्त – राज्यघटनेच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन: दि. २६ नोव्हेंबर २०२२

भारतीय राज्यघटना दि. २६ नोहेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आली. म्हणून दर वर्षी २६ नोहेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. यावर्षी हि संविधान दिवस साजरा करण्यात आला. दि. २६ नोहेंबर २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयात भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी डॉ. रमेश अहिरे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करून भारतीय राज्यघटनेने दिलेले मुलभूत अधिकार व कर्तव्य यांची माहिती सादर केली. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १७५ व्यक्ती या कार्यक्रमास उपस्थित होते.

## ४४. महात्मा जोतीराव फुले पुण्यतिथी निमित्त अभिवादन: २८ नोव्हेंबर २०२२

थोर समाज सुधारक महात्मा जोतीबा फुले यांचा मृत्यू दि. २८ नोव्हेबर रोजी पुण्यात झाला होता. २८ नोव्हेंबर रोजी महात्मा जोतीबा फुले यांची पुण्यतिथी साजरा करण्यात येते. या प्रसंगी महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक आदि उपस्थित होते.

## ४५. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरीनिर्वान दिनानिमित्त अभिवादन: दि. ६ डिसेंबर २०२२

थोर समाज सुधारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महपरीनिर्वान दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी झाले होते. दर वर्षी ६ डिसेंबर हा दिवस महापरीनिर्वान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या प्रसंगी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक आदि उपस्थित होते.

## ४६. माझी वसुंधरा अभियान अंतर्गत वृक्षारोपण: ९ डिसेंबर २०२२

पर्यावरणाचे संतुलन दिवसेंदिवस ढासळत आहे. पर्यावरणाचे संवर्धन व्हावे या दृष्टीकोनातून माझी वसुंधरा अभियानांतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात झाडे लावली. महाविद्यालयाचा परिसर ग्रीन व्हावा यासाठी हे वृक्षारोपण करण्यात आले.

## ४७. आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिवस निमित्त – शपथ: १० डिसेंबर २०२२

दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस युनोच्या मार्गदर्शनानुसार आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिवस म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिनाचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय मानव अधिकार शपथचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. रमेश अहिरे यांनी आंतरराष्ट्रीय मानव अधिकार शपथचे सामुहिक शपथ घेतली. याचबरोबर मुलभूत अधिकार व कर्तव्य यांची माहिती सादर केली. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे एकुण १६५ व्यक्ती या कार्यक्रमास उपस्थित होते.

## ४८. राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त अभिवादन: १२ जानेवारी २०२३

१२ जानेवारी हा दिवस राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती दिवस म्हणून साजरा केली जाते. स्वामी विवेकानंद जयंती हि राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी १२ जानेवारीला राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरा केली व मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो चे स्वयंसेवक उपस्थित होते.

## ४९. राष्ट्रीय मतदार दिवस निमित्त - जनजागृती अभियान आणि शपथ: २५ जानेवारी २०२३

२५ जानेवारी, राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयातील युवकांमध्ये मतदानाविषयी जनजागृती व्हावी. यासाठी राष्ट्रीय मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. मतदान आपला हक्क आहे. आणि आपण तो हक्क वापरला पाहिजे. म्हणून मतदान: माझे हक्क, माझे कर्तव्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. ज्या स्वयंसेवकांचे मतदार यादीत नाव नाही. त्यांची मतदार नोंदणीत नांवे नोंदविण्यात आली. याच बरोबर मतदानाची प्रतिज्ञा घेण्यात आली. "आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याव्दारे, प्रतिज्ञा करतो कि, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू." याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो चे स्वयंसेवक उपस्थित होते.

## ५०. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त – ध्वजवंदना व देशभक्तीपर गीत गायन आयोजन: २६ जानेवारी २०२३

दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस गणराज्य दिन म्हणून साजरा केला जातो. स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने २६ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ७.३० वाजता महाविद्यालयात ध्वजारोहणझाले. राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देऊन प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण संस्थेचे अध्यक्ष मा. दादासाहेब संजयकुमार देवरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी रासेयोच्या स्वयंसेवकांनी राष्ट्रभक्तीपर गीते सादर केली. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकुण ६० व्यक्ती उपस्थित होते.

## ५१. विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन: ३१/१/२३ ते ६/२/२३

दिनांक ३१ जानेवारी २०२३ ते ६ फेब्रुवारी २०२३ या काळात दत्तक गाव म्हसदी येथील धनदाई डोंगर परिसरात विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्याचा सविस्तर अहवाल स्वतंत्र सादर करण्यात आला आहे.

## ५२. जागतिक महिला दिवस  निमित्त स्थानिक महिलांचा सत्कार: ८ मार्च २०२३

युनोच्या मार्गदर्शन तत्वानुसार संपूर्ण जगभरात ८ मार्च हा दिवस महिलांचा सन्मान म्हणून जागतिक महिला दिवस साजरा करण्यात येतो. यावर्षी ८ मार्च रोजी दत्तक गावातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका आणि महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका आणि मुलींचा गुलाब पुष्प आणि नॅपकीन देऊन सत्कार  करून साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी असे एकुण १२५ व्यक्ती उपस्थित होते.

## ५३. **सावित्रीबाई फुले स्मृती दिन साजरा: १० मार्च २०२३**

दि. १० मार्च २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविद्यालयात सावित्रीबाई फुले स्मृतीदिनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजी पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे ७५ व्यक्ती उपस्थित होते.

## ५४. महात्मा फुले जयंती निमित्त अभिवादन: ११ एप्रिल २०२३

दि. ११ मार्च २०२३ रोजी सकाळी ९.०० वाजता महाविद्यालयात महात्मा जोतीबा फुले यांच्या जयंती निमित्त महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजी पाटील यांनी महात्मा फुले यांच्या स्मृतीस अभिवादन केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयोचे स्वयंसेवक असे ७५ व्यक्ती उपस्थित होते.

## ५५. डॉ. आबासाहेब आंबेडकर जयंती निमत्त अभिवादन: १३ एप्रिल २०२३

भारतरत्न, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली महू येथे रोजी झाला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील एक थोर समाज सुधारक, दलितांचे कैवारी आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृशता निवारणासाठी मोठया प्रमाणात चळवळ निर्माण केली. समाजातील वंचित घटकांना त्यांचे अधिकार मिळवून दिले. त्यांचे योगदान हे अतुलनीय आहे. शासनाच्या आदेशानुसार एक दिवस अगोदर १३ एप्रिल रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरा करण्यात आली. त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेवक आदि उपस्थित होते.

# वर्तमान पत्रातील बातम्यांची कात्रणे




## राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षयरोग मुक्त व कुष्ठ रोग निर्मूलन समुपदेशनपर अभियान संपन्न

म्हसदी: भारतात केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार देशभर क्षय रोग मुक्त भारत अभियान व कुष्ठ रोग निर्मूलन अभियान राबविले जात आहे. याच अनुषंगाने म्हसदी येथील स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने साक्री येथील तालुका आरोग्य पथक यांच्या सहकार्याने क्षयरोग मुक्त अभियान व कुष्ठ रोग निर्मूलन समुपदेशन अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी साक्री तालुका आरोग्य पथकाचे क्षयरोग निरिक्षक श्री. भूषण बैसाणे व श्री. अजय पवार यांनी क्षयरोग व कुष्ठ रोग या आजारांवर समुपदेशन मार्गदर्शन केले. क्षयरोग हा एक जिवाणूजन्य आजार आहे. क्षयरोग हा पूर्व

टीबी (ट्युबरक्युलोसिस) म्हणून ओळखले जाते. संसर्ग झालेल्या व्यक्तीची रोग प्रतिकारशक्ती कमी झाल्यास अशा व्यक्तींना क्षयरोगाची लागण होते. एखाद्या व्यक्तीला सतत दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला असणे, वजन कमी होणे, भूक मंदावणे, हलकासा परंतु संध्याकाळी वाढणारा ताप, छातीत दुखणे, रात्री घाम येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याच्या कफाची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. फुफ्फुसांशिवाय इतर अवयवांमध्ये क्षयरोग होतो. हाडे सांध्याचा क्षयरोग, लसीकाग्रंथीचा क्षयरोग, मज्जासंस्थेचा क्षयरोग, आतड्यांचा क्षयरोग इत्यादी. हा रोग पूर्णपणे बरा होण्यासाठी ६ महिने अथवा अधिक काळ उपचार घेणे गरजेचे असून जर



समाजातील या आजाराविषयी खूप साऱ्या समजुती व गैर समजुती आहेत. त्याविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे, असे मार्गदर्शन श्री. भूषण बैसाणे यांनी आपल्या समुपदेशनातून केले. याचबरोबर श्री. अजय पवार यांनी कुष्ठ रोग निर्मूलनाचे मार्गदर्शन केले. कुष्ठ रोगाचे लक्षणे, परिणाम आणि या आजारावरील उपचार याविषयी जनजागृतीपर

यांचेही मार्गदर्शन याप्रसंगी लाभले. शाळा, महाविद्यालयात आरोग्य शिक्षण असले पाहिजे असे प्रतिपादन श्री.दिलीप बोरसे यांनी आपल्या मनोगतातून केले. या समुपदेशनपर अभियानाच्या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा

निर्मूलनपर समुपदेशन अभियानाचे आयोजन व सूत्र संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. डॉ. वनिता पवार, डॉ. बाबासाहेब मोताळे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रम राबविल्या बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी

दि. १४ सप्टेंबर २०२२ पुण्यनगरी

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे

कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी

राष्ट्रीय सेवा योजना

# रासेयो स्वयंसेवकांकडून कुपोषित बालकांचे सर्वेक्षण



म्हसदी : येथील आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय पोषण आहार जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटील यांनी देली. महाविद्यालयाच्या वतीने व राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत म्हसदी हे गाव दत्तक घेण्यात आले. त्यानंतर येथील आदिवासी वस्तीत जाऊन स्वयंसेवकांनी कुपोषित बालकांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षण दरम्यान एकलव्य नगर, अंगणवाडी क्र.४ चे अंगणवाडी सेविका संगिता मोहीते, मदतनीस निता पाटील यांनी अंगणवाडीतील पाच कुपोषीत बालकांची ओळख करून दिली. कुपोषीत बालकांना राष्ट्रीय सेवा योजना एककमार्फत पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले.

दि. १४ सप्टेंबर २०२२

सकाळ TODAY

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे

कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी

राष्ट्रीय सेवा योजना

स्थापना-१ जुलै १९९८



म्हसदी : राष्ट्रीय पोषण सप्ताहांतर्गत कुपोषित बालक सर्वेक्षणात पोषण आहारवाटप करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे, अंगणवाडीसेविका संगीता मोहिते, नीता पाटील.

# म्हसदीत पोषण आहाराचे वाटप

म्हसदी, ता. १३ : स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवानिमित्त राष्ट्रीय पोषण महिन्याच्या जनजागृती अभियानांतर्गत येथील आर. डी. देवरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग कुपोषण निर्मूलनाच्या दिशेने जनजागृती अभियान राबवीत आहे. कुपोषित बालकांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले.

देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक गाव म्हसदी येथील आदिवासी वस्तीत कुपोषित बालकांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षण दरम्यान एकलव्य नगर, अंगणवाडी क्रमांक चारचे अंगणवाडी सेविका संगीता मोहीते व मदतनीस नीता पाटील यांनी माहिती दिली. अभियानात पंधरा स्वयंसेविका आणि दहा स्वयंसेवक सहभागी झाले. कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी संयोजन केले. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील व रासेयो साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंत पाटील यांनी सहकार्य केले.

## पुण्य नगरी



# नवरात्रोत्सवात रासेयो स्वयंसेवकांनी दिली सेवा

म्हसदी : येथील आर. डी.देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी नवरात्रोत्सवात धनदाई देवी मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी स्वयंसेवक म्हणून उत्कृष्ट काम पाहिले. याबद्दल विद्यार्थ्यांचे धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाने कौतुक केले आहे.

यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनीही स्वयंसेवकांच्या सेवेचे कौतुक केले. स्वयंसेवकांच्या पथकाचे नियोजन व व्यवस्थापन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व सहकाऱ्यांनी केले. त्यांना राष्ट्रीय सेवा योजना साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# देवरे महाविद्यालय



म्हसदी: येथील अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत 'हर घर तिरंगा' जनजागृती मोहीम राबविण्यात येते. याअंतर्गत १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान तीन दिवस आपल्या घरांवर राष्ट्रध्वज फडकवण्याचे आवाहन करण्यात महाविद्यालयाच्या वतीने करण्यात येत आहे. आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभागाने सी. डी. देवरे माध्यमिक विद्यालय व गंगामाता कन्या विद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थिनींना हर घर तिरंग्याची माहिती देऊन जनजागृती मोहीम राबविली. याप्रसंगी क्रीडा संचालक डॉ.जगदीश तोरवणे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रध्वजाची माहिती देऊन राष्ट्रध्वजाची आचार संहिता व राष्ट्र ध्वजाचे महत्व सांगितले. राष्ट्रध्वज व ध्वजारोहणासंबंधी अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना विचारले .या प्रश्नांचे शंका निरसन डॉ. तोरवणे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व क्रिडा विभाग संचालक डॉ.जगदीश तोरवणे यांनी केले होते. यावेळी सी.डी. देवरे विद्यालयाचे मुख्याध्यापक सतिष देवरे व गंगामाता कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका. वर्षा देवरे यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबवू व हर घर तिरंगा मोहीम यशस्वी करू असे जाहीर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार एस.डी. देवरे व जी.आर. देवरे यांनी केले. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी प्राध्यापकांची कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बाळासाहेब मोराळे व डॉ. वनिता पवार परिश्रम घेत आहेत. दै. पुण्यनगरी ९ ऑगस्ट २०२२

## म्हसदी महाविद्यालयाची हर घर तिरंगा जनजागृती मोहीम



# राष्ट्रीय सेवा योजना

## ८ ऑगस्ट २०२२

## हर घर तिरंगा जनजागृती मोहीम

आज़ादी का अमृत महोत्सव

## दैनिक तोफ

संपादक : अरुण पाटील (एम.ए.)

पान १ वरून

### हर घर तिरंगा जनजागृती

## पुण्य नगरी

# देवरे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राबवली स्वच्छता मोहीम



म्हसदी: आजादी का अमृत महोत्सवानिमित्त येथील अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कुलदैवत धनदाई देवी मंदिर परिसरात प्लास्टिक कचरा मुक्ती व स्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात आली. येथील ग्रामपंचायतीच्या वतीने धनदाई देवी या धार्मिक पर्यटन स्थळाच्या परिसरातून प्लास्टिक कचरा गोळा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या मदतीने परिसरातील कचरा स्वच्छ करण्यात आला. यावेळी ३० किलोपेक्षा जास्त प्लास्टिक कचरा संकलित करून योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली. त्यानंतर प्लास्टिक कचरा मुक्ती व स्वच्छतेची सामूहिक शपथ घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच व पदाधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील शिक्षक,शिक्षिका, साक्री तालुका पंचायत समितीचे पदाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, लोक प्रतिनिधी, धनदाई तरुण ऐक्य मंडळाचे पदाधिकारी व कर्मचारी यावेळी सहभागी झाले होते. या मोहिमेचे नियोजन ग्रामविकास अधिकारी मेघश्याम बोरसे व देवरे महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रमेश अहिरे यांनी केले होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयं सेवकांनी परिश्रम घेतले.

Smart Dhule
Page No.2 July 30, 2022

!! ज्ञानदीप लावू जगी !!

## स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी

## राष्ट्रीय सेवा योजना

**Not Me But You**

पुण्यनगरी दि. ११/०९/२०२२

### देवरे महाविद्यालय म्हसदी



**म्हसदी:** येथील अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटील अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी स्वच्छ व हरित महाविद्यालय परिसराची प्रतिज्ञा घेतली. ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने 'क्लीन अँड ग्रीन कॉलेज कॅम्पस' हा पुरस्कार नुकताच महाविद्यालयाला प्राप्त झाला आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षण व स्वच्छतेविषयी शपथ घेतली. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, रासेयो समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, महाविद्यालयाचे कार्यालय अधिक्षक अरुण पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.रमेश अहिरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार, डॉ. बाबासाहेब मोताळे आदींनी परिश्रम घेतले.

महोत्सव | पोलीस शोध | २ | धुळे • सोमवार दि. १० ऑक्टोबर २०२२

### समाज सेवा हिच खरी राष्ट्र सेवा-डॉ.पाटील



**म्हसदी -** येथील स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक दरवर्षी नवरात्री उत्सवात म्हसदी येथील धनदाई देवी मंदिरात स्वयंसेवेसाठी स्वयंसेवक म्हणून हजर असतात. यावर्षी दिनांक २५ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या कालावधीत नवरात्री उत्सव साजरा करण्यात आला.

स्वयंसेवकांच्या पथकांचे नियोजन व व्यवस्थापन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. त्यांना राष्ट्रीय सेवा योजना साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या नवरात्रीचे नऊ दिवस सकाळी ८ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत अविरत सेवा देण्याची परंपरा राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सालाबादप्रमाणे यावर्षीही राखली. नवरात्री उत्सवा दरम्यान महाराष्ट्रातील अनेक भागातून व इतर राज्यातून मोठ्या संख्येने भाविक देवीचे दर्शन, पूजाअर्चा व नवस फेडण्यासाठी म्हसदी येथील कुलस्वामिनी धनदाई देवीच्या मंदिरात येतात. याकाळात मंदिर व मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी व वर्दळ होत असते. भाविकांच्या गर्दीचे नियोजन करणे, मंदिर परिसरात स्वच्छता राखणे, वयस्क भाविकांना मदत करणे, महिला व लहान बालकांवर लक्ष ठेवणे याव्यतिरिक्त स्वच्छता व आरोग्य विषयी भाविकांमध्ये जनजागृती निर्माण करणे. अशा प्रकारची निस्वार्थीपणे सेवा देण्याचे कार्य रासेयोचे स्वयंसेवक करतात. यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या २५ ते ३० स्वयंसेवकांचे पथक दर दिवशी नियुक्त केलेले असतात. त्यांच्या दिवशी नेमलेले पथक सेवेसाठी हजर असते. यावर्षी स्वयंसेवक पथकात मुलींची संख्या जास्त होती ही विशेष बाब. माझ्यासाठी नव्हे, तुमच्यासाठी हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रिद वाक्य आहे. त्यानुसार रासेयोचा स्वयंसेवक समाजसेवेसाठी नेहमी तत्पर असतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख, दुःखामध्ये त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणिवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने स्वयंसेवक कार्य करतात. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या निस्वार्थ सेवेतून समाज सेवा हिच खरी राष्ट्र सेवा असते हे अधोरेखीत होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या सहकार्यामुळे धनदाई देवी मंदिरात नवरात्री उत्सवाच्या काळात आलेल्या भाविकांच्या गर्दीचे नियोजन व व्यवस्थापन करण्यास धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळ व मंडळाचे कर्मचारी यांना मोठा आधार दरवर्षी मिळतो म्हणून मंडळाचे अध्यक्ष, सुभाष देवरे व मंडळाचे सर्व पदाधिकारी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या कार्याचे व कामाचे कौतुक केले व समाजसेवेसाठी प्रेरणा दिली. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनीही स्वयंसेवकांच्या सेवेचे कौतुक केले.

# पुण्य नगरी

### धनदाई देवीच्या दर्शनासाठी भाविकांची रिघ



**म्हसदी :** नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने येथील कुलदैवत आई धनदाई देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे. यात पंचमीच्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी रिघ लागली होती. ५० हजाराच्या जवळपास भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, सचिव महेंद्र देवरे यांच्यासह संचालक मंडळाने दिली आहे.

धनदाई देवी ७२ कुळांची कुलदैवत मानली जाते. त्यामुळे मंदिर परिसरात दररोज भाविकांच्या वेगवेगळ्या ठिकाणाहून पायी दिंड्या दाखल होत आहेत. नवरात्र उत्सव काळात पंचमी, अष्टमी व नवमीला देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी मोठी गर्दी असते. त्यामुळे मंडळातर्फे नियोजन करण्यात येते. गर्दीच्या अनुषंगाने येथील आर.डी. देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी बंदोबस्तासाठी संयोजन केले होते. धुळे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुभाष देवरे यांनी सपत्नीक मंदिरावर देवीचे दर्शन घेतले. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले आहे. येथे देवीचे साज शृंगार, नारळ विक्रेते तसेच खेळणी, हॉटेल्स दुकानदार परिसरात दाखल झाले आहेत. त्यामुळे मंदिर परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. यासाठी मंडळाचे पदाधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

Smart Dhule Edition
Oct 2, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

आपलं नवराज्य
दै.आपलं नवराज्य आपल्याला व्हॉटसॲप ग्रुपला हवा असल्यास पुढील नंबर आपल्या ग्रुपमध्ये सेव्ह करा

# देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षयरोग मुक्त व कुष्ठ रोग निर्मूलन अभियान



म्हसदी (आपलं नवराज्य): भारतात केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार देशभर क्षय रोग मुक्त भारत अभियान व कुष्ठ रोग निर्मूलन अभियान राबविले जात आहे. याच अनुषंगाने म्हसदी येथील स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने साक्री येथील तालुका आरोग्य पथक यांच्या सहकार्याने क्षयरोग मुक्त अभियान व कुष्ठ रोग निर्मूलन समुपदेशन अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी साक्री तालुका आरोग्य पथकाचे क्षयरोग निरिक्षक श्री. भूषण बैसाणे व श्री. अजय पवार यांनी क्षयरोग व कुष्ठ रोग या आजारांवर समुपदेशन मार्गदर्शन केले. क्षयरोग हा एक जिवाणूजन्य आजार आहे. क्षयरोग हा पूर्ण बरा होणारा आजार आहे. एके काळी हा रोग दुर्धर समजला जाई. सामान्यतः या आजाराला टीबी (ट्युबरक्युलॉसिस) म्हणून ओळखले जाते. हृसंसर्ग झालेल्या व्यक्तीची रोग प्रतिकारशक्ती कमी झाल्यास अशा व्यक्तींना क्षयरोगाची लागण होते. एखाद्या व्यक्तीला सतत दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला असणे, वजन कमी होणे, भूक मंदावणे, हलकासा परंतु संध्याकाळी वाढणारा ताप, छातीत दुखणे, रात्री घाम येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याच्या कफाची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. फुफ्फुसांशिवाय इतर अवयवांमध्ये क्षयरोग होतो. हाडे सांध्याचा क्षयरोग, लसीकाग्रंथीचा क्षयरोग, मज्जासंस्थेचा क्षयरोग, आतड्यांचा क्षयरोग इत्यादी. हा रोग पूर्णपणे बरा होण्यासाठी ६ महिने अथवा अधिक काळ उपचार घेणे गरजेचे असून जर उपचार मधेच बंद केले तर क्षयरोग परत उलटण्याची शक्यता असते. याचबरोबर समाजातील या आजाराविषयी खूप साऱ्या समजुती व गैर समजुती आहेत. त्याविषयी जनजागृती होणे आवश्यक आहे. असे मार्गदर्शन श्री. भूषण बैसाणे यांनी आपल्या समुपदेशनातून केले. याचबरोबर श्री. अजय पवार यांनी कुष्ठ रोग निर्मूलनाचे मार्गदर्शन केले. कुष्ठ रोगाचे लक्षणे, परिणाम आणि याआजारावरील उपचार याविषयी जनजागृतीपर समुपदेशन केले. प्राथमिक आरोग्य केंद्र म्हसदी येथील औषधिनिर्माण अधिकारी श्री. दिलीप बोरसे यांचेही मार्गदर्शन याप्रसंगी लाभले. शाळा, महाविद्यालयात आरोग्य शिक्षण असले पाहिजे असे प्रतिपादन श्री.दिलीप बोरसे यांनी आपल्या मनोगतातून केले. या समुपदेशनपर अभियानाच्या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा माजी समन्वयक डॉ. वाल्मीक आढावे यांची प्रमुख उपस्थिती होती. क्षयरोग व कुष्ठ रोग निर्मूलनपर समुपदेशन अभियानाचे आयोजन व सूत्र संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. डॉ. वनिता पवार, डॉ. बाबासाहेब मोताळे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रम राबविल्या बद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी कौतुक केले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

# रासेयोतर्फे क्षयरोग मुक्त व कुष्ठरोग निर्मूलन अभियान संपन्न



**म्हसदी** - भारतात केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार देशभर क्षय रोग मुक्त भारत अभियान व कुष्ठ रोग निर्मूलन अभियान राबविले जात आहे. याच अनुषंगाने म्हसदी येथील स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने साक्री येथील तालुका आरोग्य पथक यांच्या सहकार्याने क्षयरोग मुक्त अभियान व कुष्ठ रोग निर्मूलन समुपदेशन अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी साक्री तालुका आरोग्य पथकाचे क्षयरोग निरिक्षक भूषण बैसाणे व अजय पवार यांनी क्षयरोग व कुष्ठ रोग या आजारांवर समुपदेशन मार्गदर्शन केले. क्षयरोग हा एक जिवाणूजन्य आजार आहे.

क्षयरोग हा पूर्ण बरा होणारा आजार आहे. एके काळी हा रोग दुर्धर समजला जाई. सामान्यतः या आजाराला टीबी (ट्युबरक्युलॉसिस) म्हणून ओळखले जाते. संसर्ग झालेल्या व्यक्तीची रोग प्रतिकारशक्ती कमी झाल्यास अशा व्यक्तींना क्षयरोगाची लागण होते. एखाद्या व्यक्तीला सतत दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला असणे, वजन कमी होणे, भूक मंदावणे, हलकासा परंतु संध्याकाळी वाढणारा ताप, छातीत दुखणे, रात्री घाम येणे इत्यादी लक्षणे असल्यास त्याच्या कफाची तपासणी करून घेणे आवश्यक आहे. हाडे सांध्याचा क्षयरोग, लसीकाग्रंथीचा क्षयरोग, मज्जासंस्थेचा क्षयरोग, आतड्यांचा क्षयरोग इत्यादी. हा रोग पूर्णपणे बरा होण्यासाठी ६ महिने अथवा अधिक काळ उपचार घेणे गरजेचे असून जर उपचार मधेच बंद केले तर क्षयरोग परत उलटण्याची शक्यता असते. या समुपदेशनपर अभियानाच्या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेचे साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे धुळे जिल्हा माजी समन्वयक डॉ. वाल्मीक आढावे यांची प्रमुख उपस्थिती होती. क्षयरोग व कुष्ठ रोग निर्मूलनपर समुपदेशन अभियानाचे आयोजन व सूत्र डॉ. रमेश अहिरे यांनी केले. डॉ. वनिता पवार, डॉ. बाबासाहेब मोताळे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आरोग्य जनजागृतीपर कार्यक्रम राबविल्या बद्दल प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी कौतुक केले.

पुण्य नगरी दि.१३ ऑगस्ट २०२२

# कर्करोगाबाबत जनजागृतीची गरज – जीवन माळी



**म्हसदी :** कर्करोग आजही जगासमोरील एक जीवघेणी समस्या आहे. दरवर्षी हजारो लोक कर्करोगामुळे मृत्यू पावतात. धुम्रपान करणाऱ्यांनाच कर्करोग होतो किंवा तंबाखू खाल्ल्यानेच कर्करोग होतो, असा सुरुवातीला समज होता. मात्र हळूहळू पोटाचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग जगासमोर आला आहे, असे प्रतिपादन समुपदेशक जीवन माळी यांनी केले.

नागपूर येथील स्टॉप कॅन्सर मिशन बहुउद्देशीय लाइफस्टाइल व येथील अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने कॅन्सर समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी समुपदेशक माळी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, कर्करोग कोणालाही आणि कसाही होऊ शकतो.कधी - कधी कर्करोग शरीरात असूनही कळत नाही. मात्र कर्करोगापासून वाचवणारे उपचारही आले आहेत. जनमानसात कर्करोगाबद्दल जागरुकता निर्माण व्हायला हवी, अशी अपेक्षा समुपदेश माळी यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेसाठी येथील धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष गजमल देवरे व उपाध्यक्ष के. एन. देवरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील होते. सूत्रसंचालन डॉ. रमेश अहिरे व आभार प्रदर्शन डॉ. वनिता पवार यांनी केले. कार्यशाळेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी डॉ. बाबासाहेब मोताळे आदींचे सहकार्य केले.

सकाळ TODAY

अवतीभवती दि.१९ जानेवारी २०२३

# देवरे महाविद्यालयात मतदार दिनानिमित्त स्पर्धा

**म्हसदी :** येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आणि साक्री तहसीलच्या निवडणूक नोंदणी अधिकारी यांच्यातर्फे १३ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विविध स्पर्धा होणार आहेत. गुरुवारी (ता. १९) रांगोळी स्पर्धा, २० ला घोषवाक्य, २१ ला निबंधलेखन, तर २३ जानेवारीला सामान्य ज्ञान स्पर्धा होईल. रांगोळी व घोषवाक्य स्पर्धेचा 'मतदार जनजागृती', निबंधलेखन स्पर्धेचा 'मतदान : माझे कर्तव्य-माझी जबाबदारी', तर सामान्य ज्ञान स्पर्धेसाठी 'निवडणूक आणि राष्ट्रीय मतदार दिन' हा विषय असणार आहे. रांगोळी, घोषवाक्य, निबंधलेखन आणि सामान्य ज्ञान परीक्षेमध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या स्पर्धकास २४ जानेवारीला राष्ट्रीय मतदारदिनी निवडणूक नोंदणी अधिकारी, साक्री यांच्यातर्फे महाविद्यालयात होणाऱ्या कार्यक्रमात प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे. निवडणूक साक्षरता मंडळाने महाविद्यालयातील तसेच महाविद्यालयाबाहेरील नवमतदारांची नोंदणी केल्यामुळे सर्व सदस्यांचा गौरव प्रशस्तिपत्र देऊन करण्यात येईल, अशी माहिती प्राचार्य डॉ. शिवाजी बी. पाटील, कार्यक्रमाचे संयोजक आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी दिली. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवाहन केले.

## » दृष्टिक्षेपात दै. सकाळ

दि.२७ नोव्हेंबर २०२२



म्हसदी : देवरे महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करताना प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी.

# आर. डी. देवरे महाविद्यालयात संविधान उद्देशिकेचे वाचन

**म्हसदी :** आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी भारतीय संविधान अर्थात राज्यघटनेचे महत्त्व आणि स्वरूपाविषयी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. त्यानंतर उपस्थितांनीही पाठोपाठ सामूहिक वाचन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व सहकाऱ्यांनी संयोजन केले.

## पुण्यनगरी दि.२९ नोव्हेंबर २०२२

# म्हसदी महाविद्यालय



म्हसदी : येथील आर.डी.देवरे महाविद्यालयात महात्मा जोतिराव फुले यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजीराव पाटील अध्यक्षस्थानी होते. डॉ. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. डॉ. रमेश अहिरे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य पाटील यांनी मार्गदर्शन केले.

दि.२८ नोव्हेंबर २०२२ पुण्यनगरी

# देवरे महाविद्यालय



**म्हसदी :** येथील अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ.शिवाजी पाटील अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रमेश अहिरे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकतेचे वाचन केले. त्यानंतर २६/११ च्या शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्राचार्य डॉ. पाटील यांनी संविधानाच्या प्रास्ताविकतेचे महत्व सांगितले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले होते.

## पुण्य नगरी

दि. २ नोव्हेंबर २०२२

# म्हसदीच्या आठवडे बाजारात स्वच्छता मोहीम



**म्हसदी :** मानव हा प्रगतशील प्राणी आहे. सभोवतालच्या परिसरात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांचा उपयोग करून आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करतो. मात्र निसर्गावर होणाऱ्या दूरगामी परिणामांचा विचार करीत नाही. रोजच्या वापरात असलेल्या प्लॅस्टिकमुळे प्रदूषण वाढते. म्हणून प्लॅस्टिकचा वापर टाळा, असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले.

येथील आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारत सरकार युवा व क्रीडा मंत्रालय, दिल्ली संचालित धुळे येथील नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत म्हसदी येथील आठवडे बाजारात प्लॅस्टिक कचरा संकलन अभियान राबविण्यात आले. यावेळी डॉ. अहिरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आठवडे बाजारात ३० किलो पेक्षा जास्त प्लॅस्टिक कचरा संकलित करण्यात आला. त्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. अभियानाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व सहकाऱ्यांनी केले. प्लॅस्टिक कचरा संकलन करून स्वच्छता अभियान दत्तक गावात राबविले. याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, रासेयोचे साक्री तालुका विभाग समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांचे ग्रामस्थांनी कौतुक केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

पुण्य नगरी

# बहिणाबाईंच्या कविता म्हणजे जीवनाचे तत्त्वज्ञान – प्रा.डॉ.आढावे



म्हसदी : येथील स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त विद्यार्थी विकास विभागामार्फत व्याख्यान आयोजीन करण्यात आले होते. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव देण्यात आले होते. तेव्हापासून ११ ऑगस्ट हा दिवस नामविस्तार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या निमित्ताने येथील महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख डॉ. व्ही. एस.आढावे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य डॉ.शिवाजी पाटील अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी प्रा.डॉ. आढावे यांनी बहिणाबाई चौधरी यांचा जीवनपट उलगडून दाखवला. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील जीवनाचे तत्त्वज्ञान थक्क करणारे आहे. एका अशिक्षित स्त्रीच्या साहित्यिक कर्तृत्वामुळे त्यांचे नाव विद्यापीठाला देण्यात आले, ही खऱ्या अर्थाने गौरास्पद बाब आहे. त्यांच्या कविता आपणांस जीवन जगण्यासाठी मार्गदर्शक ठरतात असे प्रतिपादन प्रा. आढावे यांनी केले. यावेळी मन, माणूस, संसार अशा अनेक कवितांचे दाखले दिले. त्यानंतर प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, बहिणाबाई चौधरी यांच्या कविता या मराठी साहित्य विश्वाला पडलेले एक सुंदर स्वप्न आहे. त्यांच्या साहित्यातील निसर्ग जाणिवा, जीवनाचे तत्त्वज्ञान अचंबित करणारे आहे. याप्रसंगी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचलन प्रा. उमेश गवई यांनी तर आभार प्रा. डॉ. वनिता पवार यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. विठ्ठल साळुंखे यांनी केले.

Smart Dhule
Page No.2 August 28, 2022

दैनिक तोफ गुरूवार २० ऑक्टोबर २०२२

# जल, जंगल, जमीन आणि सजीव सुरक्षेसाठी प्लॅस्टिक कचरा मुक्ती जनजागृतीची गरज - डॉ. रमेश अहिरे

म्हसदी: मानव हा प्रगतशील प्राणी आहे. सभोवतालच्या परिसरात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनांचा उपयोग मानव आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी करत असतो. हे करत असताना निसर्गावर होणाऱ्या दूरगामी परिणाम मानवाने दुर्लक्षित केले. रोजच्या वापरात असलेले प्लॅस्टिक असेच एक सहज व कुठेही वापरता येणारे आणि भयानक प्रदूषण करणारे साधन मानवाने रासायनिक प्रक्रियाकरून निर्माण केले आहे. प्लॅस्टिकचा वापर मानवाने मोठ्या प्रमाणात वापर सुरू केला आहे.

प्लॅस्टिक मुळे होणारे प्रदुषण आणि त्यामुळे होणारे दुष्परिणाम हे दूरगामी स्वरूपाचे आहेत. प्लॅस्टिकचा अतिवापर व त्यामुळे होणारे परिणाम जल, जंगल जमीन आणि सजीव सृष्टीवर हानीकारक ठरत आहेत. जर जल, जंगल, जमीन आणि सजीव जीवन सुरक्षित ठेवायचे असेल तर प्लॅस्टिकचा वापर टाळून संपूर्ण



प्लॅस्टिक मुक्तीचा संकल्प करून समाजात जनजागृती करावी. असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी प्लॅस्टिक कचरा संकलन करणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना केले. म्हसदी येथील स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भारत सरकार युवा व क्रीडा मंत्रालय, दिल्ली संचालित धुळे येथील नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत म्हसदी येथील आठवडे बाजार परिसरात प्लॅस्टिक कचरा संकलन अभियान राबविण्यात आले. या प्रसंगी ३० किलो पेक्षा जास्त प्लॅस्टिक कचरा संकलित करून शास्त्रीय पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्यात आली. अभियानाचे आयोजन व नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व सहकाऱ्यांनी केले. प्लॅस्टिक कचरा संकलन करून स्वच्छता अभियान दत्तक गावात राबविले याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील व रासेयोचे साक्री तालुका विभाग समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी कौतुक केले. या अभियानात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

सकाळ TODAY

**अवतीभवती** दि. १४ ऑक्टोबर, २०२२



**म्हसदी : धनदाईदेवी मंदिर परिसरात कचरा, प्लॅस्टिकमुक्त अभियान राबविताना देवरे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक.**

## धनदाईदेवी मंदिर परिसरात स्वच्छता अभियान

**म्हसदी :** येथील आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छता ही सेवा अभियानानिमित्त धनदाईदेवी मंदिराच्या धार्मिक स्थळी प्लॅस्टिक, कचरा मुक्ती व स्वच्छता अभियान राबविण्यात आले. तीस किलो प्लॅस्टिक कचरा गोळा करण्यात आला. प्लॅस्टिक कचऱ्याची खड्डा खोदून विल्हेवाट लावण्यात आली. प्लॅस्टिक कचरा मुक्ती व स्वच्छतेची सामूहिक शपथ घेण्यात आली. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे व सहकाऱ्यांनी संयोजन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी मार्गदर्शन केले.

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे
कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी
राष्ट्रीय सेवा योजना

पुण्यनगरी १३ ऑक्टोबर २०२२

## रासेयो स्वयंसेवकांतर्फे धनदाई मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम



**म्हसदी:** येथील आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छता ही सेवा अभियान अंतर्गत येथील कुलदैवत धनदाई देवी मंदिर परिसरात प्लॅस्टिक कचरा मुक्ती व स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

गेल्या आठवड्यात नवरात्रोत्सवाच्या निमित्त हजारो भाविक कुलस्वामिनीच्या दर्शनासाठी आले होते. त्यामुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या, कॅरिबॅग व पॅकिंग फुडचे रॅपर्स फेकलेले होते. या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरण्याची शक्यता लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्लास्टिक मुक्ती व स्वच्छता अभियान अंतर्गत धनदाई देवी मंदिर परिसरातील प्लॅस्टिक इतर कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला. यावेळी ३० किलोपेक्षा जास्त प्लॅस्टिक व इतर कचरा गोळा करण्यात आला. गोळा केलेल्या प्लॅस्टिक कचऱ्याची खड्डा खोदून विल्हेवाट लावण्यात आली. त्यानंतर स्वयंसेवकांना प्लॅस्टिक कचरा मुक्ती व स्वच्छतेची सामूहिक शपथ घेण्यात आली. यावेळी धार्मिक स्थळी प्लॅस्टिक मुक्ती व स्वच्छता अभियान राबविल्यामुळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील यांनी स्वयंसेवकांचे कौतुक केले. अभियानाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी मार्गदर्शन केले.

धुळे • बुधवार दि. २८ सप्टेंबर २०२२ | खान्देश परिसर | पोलीस शोध

## देवरे महाविद्यालयात रासेयो स्थापना दिनानिमित्त स्वयंसेवक अभिमुखता कार्यशाळा संपन्न



**म्हसदी -** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष १९६९ पासून अंमलात आली. २४ सप्टेंबर १९६९ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना' स्थापन करण्यात आली. तेंव्हा पासून दरवर्षी २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस म्हणून साजरा करतात. 'माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य देश आणि समाज सेवेसाठी स्वयंसेवकांना प्रेरित करते. यातून सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते. नि:स्वार्थ सेवा करण्याची भावना स्वयंसेवकांच्या मनात निर्माण होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजप्रबोधन, जनजागृती, पर्यावरण आणि निसर्ग संवर्धन, आरोग्य जनजागृती, आपत्ती काळात मदत आणि साक्षरता प्रसार, ग्राम स्वच्छता, जल साक्षरता असे विविध उपक्रम राबविले जातात. स्वयंसेवकांना आपले व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे खुले व्यासपीठ आहे. असे प्रतिपादन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित स्वयंसेवक अभिमुखता कार्यशाळेत मार्गदर्शन प्रसंगी केले. स्वयंसेवक अभिमुखता कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील हे होते. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत असते. निर्मलग्राम, सर्वांगीण व शाश्वत ग्रामविकास, चर खोदणे, रस्ते बांधणी, पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य जनजागृती, स्वच्छता, श्रमदान, पथनाट्य, रॅली, उद्बोधक चर्चा, शिवारफेरी, गावकरी संवाद या माध्यमांतून समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक करीत असतात. असे उद्गार प्राचार्य यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून केली.

# देवरे महाविद्यालयात कॅन्सर समुपदेशन कार्यशाळा संपन्न



म्हसदी: कॅन्सर अर्थात कर्करोग आजही जगासमोरील एक जीवघेणी समस्या आहे. हजारो लोक दरवर्षी कर्करोगामुळे मृत्यू पावतात. पहिल्यांदा जेव्हा कर्करोगाचा जगाशी सामना झाला तेव्हा एक समज निर्माण झाला की जे धुम्रपान करतात त्यांनाच कर्करोग होतो किंवा तंबाखू खाल्ल्यानेच कर्करोग होतो. पण हळूहळू पोटाचा कर्करोग, स्तनांचा कर्करोग आणि अन्य कर्करोग जगासमोर उलगडू लागले आणि हे सत्य समोर आले की कर्करोग कोणालाही आणि कसाही होऊ शकतो आणि तेव्हापासून कर्करोगाची जास्त भीती निर्माण झाली. सगळ्यात भयानक गोष्ट म्हणजे कधी कधी कर्करोग शरीरात असूनही कळत नाही. आता कर्करोगापासून वाचवणारे उपचारही आलेत. पण तरी आजही जनमानसात कर्करोगाबद्दल जागरुकता नाही किंवा त्यांना त्याबद्दल काही माहिती नाही. त्याच दृष्टीने थोडी जागरुकता निर्माण करावी यासाठी स्टॉप कॅन्सर मिशन बहुउद्देशीय सोसायटी आणि आरोग्यधन लाईफस्टाईल, नागपुर व स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने (पान ४ वर)

पान १ वरून

## देवरे महाविद्यालयात कॅन्सर समुपदेशन

राष्ट्रीय सेवा योजना विभागाने कॅन्सर समुपदेशन कार्यशाळा आयोजित केली होती. त्याप्रसंगी समुपदेशक श्री. जीवन माळी यांनी कर्करोग आणि त्याच्या लक्षणांबद्दल विस्तृत माहिती देऊनकॅन्सर म्हणजे कायकर्करोग हा आता एक सामान्य आजार झाला आहे त्यामुळे त्याबद्दल प्रत्येकाला माहिती असणे गरजेचे आहे असे मार्गदर्शन श्री. माळी यांनी केले. कॅन्सर समुपदेशन कार्यशाळेत प्रमुख अतिथी म्हणून म्हसदी येथील धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष दादासाहेब श्री. सुभाष गजमल देवरे, उपाध्यक्ष अण्णासाहेब श्री. के. एन. देवरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील होते. सूत्रसंचालन डॉ. रमेश अहिरे व आभार प्रदर्शन डॉ. वनिता पवार यांनी केले. कार्यशाळेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. कार्यशाळा यशस्वितेसाठी डॉ. बाबासाहेब मोताळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

दैनिक **तोफ**
संपादक : अरूण पाटील (एम.ए.)
वर्ष : १ | अंक – ११३ | शनिवार १३ ऑगस्ट २०२२ | पाने : ४ | किंमत २ रू

दैनिक **तोफ**
संपादक : अरूण पाटील (एम.ए.)
वर्ष : १ | अंक – १३३ | सोमवार ५ सप्टेंबर २०२२ | पाने : ४ | किंमत २ रू







# देवरे महाविद्यालयात रासेयोतर्फे शिक्षक दिन उत्साहात साजरा



म्हसदी येथील स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयात ५ सप्टेंबर शिक्षक दिवस राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या स्वयंसेवकांकडून उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांची भूमिका नेहमीच महत्त्वाची ठरते. शिक्षक विद्यार्थी जीवनाला आकार देत असतो. म्हणून शिक्षकांप्रती आपल्या मनातील आदर व्यक्त करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी स्वच्छ व हरित महाविद्यालय परिसर याची प्रतिज्ञा घेतली. ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने क्लीन अँड ग्रीन कॉलेज कॅम्पस हा पुरस्कार नुकताच प्राप्त झाला. त्यानिमित्ताने ही प्रतिज्ञा घेण्यात आली. यानिमित्त संकल्प केला की वृक्ष लागवड करून, त्यांचे जतन व संगोपन करू. महाविद्यालय परिसरात स्वच्छता राखू. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, रासेयो, साक्री विभाग समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, महाविद्यालयाचे कार्यालय अधिक्षक श्री. अरुण पवार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रमेश अहिरे यांनी केले, तर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार, डॉ. बाबासाहेब मोताळे तसेच वरिष्ठ स्वयंसेवकांनी श्रम घेतले.

# स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे

## कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी

## राष्ट्रीय सेवा योजना

स्थापना-१ जाने १९९८

NOT ME BUT YOU


दैनिक **तोफ** दि. ९ सप्टेंबर २०२२

संपादक : अरूण पाटील (एम.ए.)

वर्ष : १ | अंक – १३७ | शुक्रवार ९ सप्टेंबर २०२२ | पाने : ४ | किंमत २ रू


# कुपोषीत बालक सर्वेक्षण आणि पोषण आहार वाटपातून कुपोषण निर्मूलन जनजागृती अभियान संपन्न




म्हसदी: स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय पोषण महिन्याच्या जनजागृती अभियानांतर्गत स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रभावीपणे जनजागृती (पान ४ वर)



पान १ वरून

## कुपोषीत बालक सर्वेक्षण आणि पोषण

करत कुपोषण निर्मूलनाच्या दिशेने जनजागृती अभियान राबवित आहे. कुपोषणमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी जनजागृतीच्या माध्यमातून लोकांना आरोग्य सुरक्षेचा संदेश दिला जात आहे.देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक गाव म्हसदी येथील आदिवासी वस्तीत कुपोषित बालकांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षण दरम्यान एकलव्य नगर, अंगणवाडी क्रमांक ४ चे अंगणवाडी सेविका सौ. संगिता बापु मोहीते व मदतनीस सौ. निता विजय पाटील यांनी आपल्या अंगणवाडीतील पाच कुपोषीत बालकांची ओळख करून दिली. सदर कुपोषीत बालकांना राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या मार्फत पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. अंगणवाडी सेविका व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक आणि स्वयंसेविका यांनी गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांनी आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आणि पौष्टिक आहार वेळेवर घेण्याचे मार्गदर्शन केले. राष्ट्रीय पोषण महिन्यामध्ये अंगणवाडी केंद्रांमध्ये कुपोषित आणि गंभीर कुपोषित बालकांची ओळख पटवली जात आहे. यासोबतच कुपोषित बालके आणि त्यांच्या मातांना त्यांची काळजी घेण्यासाठी समुपदेशन करण्याचे कार्य अंगणवाडी सेविका व राष्ट्रीय सेवा योजना एकक करीत आहे. राष्ट्रीय पोषण समाह अंतर्गत राबविण्यात आलेल्या कुपोषित बालक सर्वेक्षण, पोषण आहार वाटप व कुपोषण निर्मुलन जनजागृती अभियानात १५ स्वंयसेविका आणि १० स्वयंसेवक सहभागी झाले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. समाज उपयोगी उपक्रम राबविल्याने महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. शिवाजी पाटील व रासेयो साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंत पाटील यांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.

# राष्ट्रीय सेवा योजनाः युवकांमधील सेवा आणि त्याग भावना विकासाचे माध्यम

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सूचनेनुसार डॉ. सी. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समिती नेमण्यामागचा प्रमुख उद्देश उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थी व युवकांचा राष्ट्राच्या उभारणीमध्ये योगदान असावे, यासंबंधी योजना तयार करणे हा होता. या समितीने अनेक देशातील युवकांशी संबंधित धोरणाचा अभ्यास करून राष्ट्रीय सेवा योजनेची सूचना केली होती. अशाच पध्दतीची शिफारस कोठारी आयोगाने १९६४ ते १९६५ मध्ये सूचविली होती. त्यानुसार स्वयंसेवी स्वरूपामध्ये एक कार्यक्रम दिला होता. याच आधारावर समाजसेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्याची सूचना केली गेली.

सप्टेंबर १९६७ मध्ये कुलगुरूंच्या परिषदेमध्ये अशा प्रकारच्या सूचनेचे स्वागत करण्यात आले आणि त्यामध्ये एक समिती गठित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार समाजसेवा ही शिक्षणाचा एक भाग असेल अशा पद्धतीची शिफारस पुढे आली. या कुलगुरूंच्या समितीने सुचवल्याप्रमाणे चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये योजना आयोगाने पाच कोटी अनुदान मंजूर केले. ज्या माध्यमातून निवडक महाविद्यालये व इतर संस्थांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष १९६९मध्ये ही योजना सुरू करण्यात यावी असा विचार झाला. यानुसार २४ सप्टेंबर १९६९ रोजी राष्ट्रीय सेवा योजनासुरू करण्यात आली.

माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठीफ ( Not Me But You ) हे राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधवाक्य आहे. यातून लोकशाही, सामाजिक बांधिलकीची जाणीव स्पष्ट होते. नि:स्वार्थ सेवा करण्याचे प्रतिक यातून प्रतीत होते. या बोधवाक्यातुन त्याग भावना सूचित होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांच्या मनामध्ये देश आणि समाजासाठी सेवा व त्याग करण्याची भावना जागृत होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे चिन्ह हे ओडिशा राज्यातील कोणार्क येथील सूर्य मंदिराच्या रथाच्या चाकावर आधारित आहे. चक्र हे गतीचे प्रतीक आहे. लातूर येथे घडलेला भूकंप, भुज येथील भूकंप, केरळमधील महापूर, बिहारमधील महापूर यांसारख्या आपत्तींमध्ये आणि आताच्या कोविड-१९ महामारीच्या काळात स्वयंसेवकांनी सर्वच स्तरावर समाजसेवेचे कार्य सेवा व त्याग भावनेतून केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी अशा आपत्ती काळात विशेष योगदान दिलेले आहे. त्यामध्ये गावात निर्जंतुकीकरणाची फवारणी, संसर्ग विषयी जनजागृती, लोकांमध्ये आत्मविश्वास जागृत करणे, जीवनावश्यक असणारे साहित्य गोळा करून वितरीत करणे, मदत करणे यासारखे उपक्रमातून युवकांची देशासाठी सेवा व त्यागाची भावना दिसून आली. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे विविध सामाजिक गटांना एका राष्ट्रीय घटकात आणि प्रवाहात सामील करून घेण्याची प्रक्रिया होय. दत्तक गावात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वयंसेवक हे राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व पटवून सांगतात व त्यास क्रियात्मक रूप देतात. युवकांचे व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणणे राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना दत्तक गावात विविध प्रकारचे सर्वेक्षण करावे लागते. नवीन नवीन योजनांची माहिती घ्यावी लागते. त्यावेळी लोकांशी संवाद साधावा लागतो, या सरावामुळे ते संवादकौशल्य वाढीस लागते. वक्तृत्व हा एक व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी पैलू आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सभा संचालन, प्रास्ताविक भाषण, मनोगत, आभार प्रदर्शन करावयाचे असते. यामुळे मैदानी वक्तृत्वाचा लाभ होतो. अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान ठरली आहे, यात शंका नाही.



डॉ. रमेश चुडामण अहिरे
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग
स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे, कला व विज्ञान
महाविद्यालय, म्हसदी ता. साक्री, जि. धुळे
मो. नं. ९७६३०११९९१
rc_ahire@rediffmail.com

राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत असते. नियमित कार्यक्रमांद्वारे महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी साजरी करून. महापुरुषांनी देशासाठी केलेले सेवा कार्य व त्याग याविषयी माहिती युवकांना दिली जाते. अशा कार्यक्रमातून युवकांमध्ये महापुरुषांनी देश व समाजासाठी दिलेली सेवा व केलेल्या त्यागाचे महत्व समजते. यातून युवकांच्या मनात सेवा व त्यागाची भावना वाढीस लागते. युवक महापुरुषांच्या विचारांचे अनुकरण करतात. श्रमदान, युवा समाह, कार्यशाळा, शिबिर, सरकार राबवीत असलेले विविध उपक्रम, अभियान आणि कार्यक्रमांत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी होतात. या माध्यमातून देखील युवकांमध्ये देशसेवा करण्याची संधी मिळते. महात्मा गांधींचा ड्ढखेडयाकडे चलाफ हा विचार घेऊन गावांमध्ये विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरांमार्फत निर्मलग्राम, सर्वांगीण व शाश्वत ग्रामविकास, चर खोदणे, रस्ते बांधणी, पाणी अडवा पाणी जिरवा, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य जनजागृती, स्वच्छता, श्रमदान, पथनाटय, रॅली, उद्‍बोधक चर्चा, शिवारफेरी, गावकरी संवाद या माध्यमांतून समाजाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात ऊर्जास्त्रोत पुरविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना युवाशक्तीच्या स्वरूपात करीत असते. हि युवा ऊर्जा पुढे सेवा व त्याग भावनेचे रूप धारण करते.

स्वयंशिस्त, समाजसेवा, सामाजिक बांधिलकी, सेवाभाव, मूल्यशिक्षण यातून देश व समाजासाठी त्याग भावना स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. युवकांमध्ये सामाजसेवा आणि देश सेवा, सामाजिक बांधिलकीची जाणीव, राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना निरंतर करीत आहे. अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजना युवकांच्या मनात सेवा व त्याग भावना विकसित करण्याचे मध्यम ठरत आहे. यात तीळ मात्र शंका नाही!

दि. १४ सप्टेंबर २०२२

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे

कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी

सकाळ TODAY

राष्ट्रीय सेवा योजना



म्हसदी : राष्ट्रीय पोषण सप्ताहांतर्गत कुपोषित बालक सर्वेक्षणात पोषण आहारवाटप करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे, अंगणवाडीसेविका संगीता मोहिते, नीता पाटील.

स्थापना-१ जुलै १९९८

# म्हसदीत पोषण आहाराचे वाटप

म्हसदी, ता. १३ : स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवानिमित्त राष्ट्रीय पोषण महिन्याच्या जनजागृती अभियानांतर्गत येथील आर. डी. देवरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग कुपोषण निर्मूलनाच्या दिशेने जनजागृती अभियान राबवीत आहे. कुपोषित बालकांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले.

देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक गाव म्हसदी येथील आदिवासी वस्तीत कुपोषित बालकांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षण दरम्यान एकलव्य नगर, अंगणवाडी क्रमांक चारचे अंगणवाडी सेविका संगीता मोहीते व मदतनीस नीता पाटील यांनी माहिती दिली. अभियानात पंधरा स्वयंसेविका आणि दहा स्वयंसेवक सहभागी झाले. कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी संयोजन केले. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील व रासेयो साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंत पाटील यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी

# देवरे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राबवली स्वच्छता मोहीम

**म्हसदी:** आजादी का अमृत महोत्सवानिमित्त येथील अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने कुलदैवत धनदाई देवी मंदिर परिसरात प्लास्टिक कचरा मुक्ती व स्वच्छता अभियान मोहीम राबविण्यात आली. येथील ग्रामपंचायतीच्या वतीने धनदाई देवी या धार्मिक पर्यटन स्थळाच्या परिसरातून प्लास्टिक कचरा गोळा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. देवरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या मदतीने



परिसरातील कचरा स्वच्छ करण्यात आला. यावेळी ३० किलोपेक्षा जास्त प्लास्टिक कचरा संकलित करून योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली. त्यानंतर प्लास्टिक कचरा मुक्ती व स्वच्छतेची सामूहिक शपथ घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीचे सरपंच व पदाधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्राचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील शिक्षक,शिक्षिका, साक्री तालुका पंचायत समितीचे पदाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, लोक प्रतिनिधी, धनदाई तरुण ऐक्य मंडळाचे पदाधिकारी व कर्मचारी यावेळी सहभागी झाले होते. या मोहिमेचे नियोजन ग्रामविकास अधिकारी मेघश्याम बोरसे व देवरे महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रमेश अहिरे यांनी केले होते.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयं सेवकांनी परिश्रम घेतले.

Smart Dhule
Page No 2 July 30, 2022